
# माधुरी नाईक

# पूणे जिल्हा३



# पुणे जिल्हा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पुणे जिल्हा

भाग ३

संकलन : माधुरी नाईक

ई साहित्य प्रतिष्ठान

# पुणे जिल्हा : भाग ३

संकलन : माधुरी नाईक, मंचर

Madhuri. jadhav26@yahoo. co. in

9820234891
8369371412

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखक-लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखक वा लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ ऑगस्ट २०१८

©esahity Pratishthan® 2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे पुस्तक महाराष्ट्रातील समस्त भटक्यांना समर्पित

माधुरी नाईक

माधुरी नाईक यांची आजवरची प्रकाशित पुस्तके

सज्जनगड सातारा

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sajjangad_satara_madhuri_naik.pdf

खादेरी उंदेरी जलदुर्ग

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/jaldurga_khanderi_underi.pdf

माहुलीगड

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/e_book_mahuligad.pdf

हम्पी बदामी ऐहोळे

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/hampi_madhuri_naik.pdf

पुणे जिल्हा भाग १ व २

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_1_madhuri_a_naik.pdf

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/pune_jilha_2_madhuri_naik.pdf

इंदोर उज्जैन मध्यभारत


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/indore_ujjain_madhuri_naik.pdf


ठाणे (पर्यटनस्थळे) :        माधुरी नाईक


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/thane_madhuri_naik.pdf


किल्ले सिंधुदूर्ग

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/sindhudurga__madhuri_naik.pdf










माधुरी नाईक
सज्जनगड
सातारा


हंपी बदामी ऐहोले
माधुरी नाईक




दुर्ग दुर्गम भारी
जलदुर्ग
खांदेरी - उंदेरी


पुणे जिल्हा
पुणे जंक्शन
PUNE JUNCTION
PUNE
माधुरी नाईक


पुणे जिल्हा२
माधुरी नाईक

# माधुरी अरविंद नाईक



भटकंती सर्वांनाच आवडते. नवनवीन प्रदेश, गावं पहावी, तिथले खाद्यपदार्थ चाखावे, वेगवेगळ्या लोकांना भेटावे हे अगदी लहान मोठ्या सर्वांनाच आवडते. पण आपण जिथे जाऊ त्या ठिकाणाची माहिती देऊन इतर लोकांनाही त्या ठिकाणाची सफ़र घडवून आणायची या इच्छेने त्या प्रवासाच्या नोंदीजपून ठेवणे आणि फ़ोटो जमा करून त्या सर्वांचा उपयोग करून त्यांची ई पुस्तके बनवून लाखो लोकांना विनामूल्य देणे हा माधुरी नाईक यांचा छंद आहे. ई साहित्य प्रतिष्ठानच्या दुर्ग आणि प्रवास विभागाच्या मुख्य माधुरी नाईक या व्यवसायाने डिझायनर आहेत. त्यांचे पती अरविंद नाईक यांच्यासह त्या ई साहित्य प्रतिष्ठानच्या कोअर कमिटीच्या सबासद आहेत. आपली नोकरी व कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून त्या हे काम करतात.

आपणही आपल्या प्रवासाची माहिती , नोंदी आणि फ़ोटो त्यांना पाठवून अशाच तऱ्हेने पर्यटकांना मदत करू शकता आणि महाराष्ट्राचे नाव पर्यटनामध्ये पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी हातभार लावू शकता.



Junnar
Ambegaon
Khed
Maval
Shirur
Mulshi
Pune
Haweli
Daund
Velhe
Purandar
Bhor
Baramati
Indapur

पुणे जिल्ह्याची सफर आज आपण करणार आहोत. पुणे तिथे काय उणे हे आपण नेहमी ऐकतो. खरंच! त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या फिरण्यासाठी पुण्यात स्थळे आहेत. आपल्या सोयीसाठी तालुक्याप्रमाणे त्याचे विभागीकरण केले आहे.मी मला जमेल तसे यात वर्णन केले आहे. काही नविन स्थळांची माहिती पुणेरी भटक्या मित्रांनी दिली आहे. काही इंटरनेट वरुन तसेच काही वर्तमानपत्रा मधे मिळालेली माहिती एकत्र केली आहे माझ्या पुढच्या भटकंतीसाठी. आणि हल्ली सर्व जण कुठे ना कुठे जात असतातच. गेले की तिथले फोटो काढुन ते आपल्या मोबाईलवर  डिसप्ले फोटो ठेवतच असतात. मग काय आपोआप डिसप्ले फोटो छान आहे. कुठे गेलेले असे विचारले की मिळाली थोडी नवी माहिती, नवे स्थळ. वाचक ही त्यांच्या जवळची अशी स्थळे नक्की कळवतील अशी आशा करते. प्रत्येक गावात एक मंदिर तर असतेच. असेल तर एखादी नदी काही ऐतिहासिक वारसा असेल तर तेवढेच कळवा.. काही स्थळे फार अगोदर बघितली असल्याने कसे गेलो होतो हे देखिल आठवत नाहियॆ. पण ते तुम्ही तर नक्किच शोधाल..त्यात पण एक मजा असते. रस्त्यांच्या बाबतीत माझा फार गोंधळ असतो. पण भटक्यांना काय ठिकाणाचे नाव कळाले तरी पुरे असते. पुढचे शोधण्याचे काम ते बरोबर करतात. तुम्हाला काही अजुन माहित असल्यास नक्की कळवा.

शिवरायांनी याच पुण्यात बालपणी संस्कारांचे व पराक्रमी धडे गिरविले. पेशवाईमध्ये याच पुण्याने राजधानीचे स्थान भूषविले. पेशव्यांचे कर्तृत्वही फुलविले याच पुण्याने. असे हे पुणे ! लोकमान्य टिळकांची ही कर्मभूमी. थोर समाजसुधारक जोतिबा फुल्यांच्या समाजपरिवर्तनाच्या कार्यास सुरुवातही येथूनच झाली. या कार्याला प्रेरणाही या पुण्यातच मिळाली आणि.... विरोधही येथेच झाला.

समाजपरिवर्तन, सुधारणेच्या कार्यात सर्वस्व झोकून देणाऱ्या अनेक समाजसुधारकांचे कर्तृत्व याच पुण्याने फुलविले. गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी), महात्मा जोतिबा फुले, यांसारखे समाजसुधारक ही पुण्याच्या मातीने राष्ट्राला दिलेली देणगीच ठरली. रा. गो. भांडारकर, सुधाकर आगरकर,लोकमान्य टिळक, गोपाल कृष्ण गोखले, महर्षी धोंडो केशव कर्वे यांसारख्या नररत्नांचे कार्यक्षेत्र ही हे पुणेच.

पुणे शहराच्या नावावरून जिल्ह्यासही पुणे जिल्हा असे नाव पडले. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात होऊन गेलेल्या टॉलेमी याच्या लिखाणात पुण्याचा 'पुन्नाटा' असा उल्लेख आढळतो. राष्ट्रकूट राजवटीत या गावाचा 'पुनवडी' नावाने उल्लेख केला जाई. पुण्य या शब्दावरून पुणे हे नाव पडले असावे, अशीही एक उपपती मांडली जाते. मुळा व मुठा या नद्यांच्या संगमावर वसलेले पुण्यस्थळ म्हणून हे नाव पडले असावे. मोगल राजवटीत या गावाचा 'कसबे पुणे' असा उल्लेख आढळतो.

आंध्र, चालुक्य व राष्ट्रकुटांच्या प्राचीन राजवटी पुण्याने पाहिल्या. मध्य युगातील यादवांचा अमलही पुण्याने पाहिला. बहामनी, निजामशाही व आदिलशाही राजवटीही येथेच त्यांच्या मनात रुजले. मराठा राजवटीत पुणे हे एक महत्त्वाचे राजकीय केंद्र होते. पुढील काळात पेशव्यांनी आपली राजधानी येथे वसविली. १८१८ साली मराठेशाहीचा अस्त झाला व पुण्याच्या शनिवारवाड्यावरील भगव्या शेंड्याची जागा 'युनियन जॅक'ने घेतली. स्वांतत्र्य आंदोलनातही पुणे अग्रभागी राहिले. आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडक्यांची कर्मभूमीही पुणे हीच होती. पुण्याच्या गणेशखिंडीतच २२ जून १८९७ रोजी चापेकर बंधूनी रँड या जुलमी प्लेग कमिशनरचा वध केला. अनेक क्रांतिकारकांनी व स्वतंत्र्य सेनानींनी पुण्यास आपली कर्मभूमी मानले होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि पुण्याच्या शनिवारवाड्यावरील 'युनियन जॅक'ची जागा भारताच्या 'तिरंगी झेंड्याने' घेतली.

पुणे शहर भारताच्या इतर महत्त्वाच्या शहरांशी रस्ता, रेल्वे व हवाईमार्गाने चांगल्या प्रकारे जोडले गेले आहे. पुणे विमानतळावरुन पूर्वी फक्त देशांतर्गत वाहतूक चालत असे पण आता सिंगापूर व दुबईला जाणाऱ्या उड्डाणांमुळे, विमानतळ आंतरराष्ट्रीय झाला आहे.

नवा ग्रीनफिल्ड पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प महाराष्ट्र सरकार सुरू करणार असून तो चाकण व राजगुरुनगर या गावांमधील चांदूस व शिरोळी यांच्या जवळ (पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर) होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे सोपवली गेली आहे.

पुणे जिल्ह्यातील तालुके : एकूण तालुके चौदा.

१. पुणे शहर

२. हवेली ६४

३. खेड ७५

४. आंबेगाव ८१

५. जुन्नर 74

६. शिरूर १०८

७. दौंड १२२

८. इंदापूर १२४

९. बारामती १२८

१०. पुरंदर १४१

११. भोर १५६

१२. वेल्हे १६०

१३. मुळशी १६२

१४. मावळ १५४

# बारामती तालुका

## श्री क्षेत्र सोमेश्वर, करंजे

नीरा - बारामती रस्त्यावरील करंजेपूल गावापासून ५ किलोमीटर अंतरावर उत्तरेला, तर पुणे बारामती रस्त्यावरील मोरागावापासून पंधरा किलोमीटर अंतरावर दक्षिणेला श्री क्षेत्र करंजे येथे सोमेश्वर मंदिर वसले आहे. येथील स्वयंभू लिंगाचे दर्शन घेणेसाठी श्रावण महिन्यात आणि महाशिवरात्रीला राज्यभरातून लाखो लोक गर्दी करतात. गुजरात सौराष्ट्र सीमेवरील सोरटी सोमनाथ हे सोमनाथाचे प्रतिरूप मानले जाते. सतीचा वान हा प्रसिद्ध मराठी चित्रपट येथील कथेवर बेतला आहे. करंजे येथे मालुबाई नावाची शिवभक्त स्त्री नांदत होती.सासूच्या जाचामुळे रात्रीच्या वेळी ओढ्याखाली जाऊन वाळूची पिंड तयार करून ती शंकराची भक्ती करायची. तीच्या इच्छेखातर गुजरातचा सोरटी सोमनाथ सोमेश्वर येथे प्रकट झाला अशी कथा सांगितली जाते. तेव्हापासून हे सोमेश्वरचे ठाण बनले आहे. माळवाडी येथे अजूनही ओढ्याकाठी मालूबाईचे छोटे मंदिर आहे. मंदिर प्राचीन काळापासून अस्तित्वात असले तरी बांधकाम यादवकालीन असल्याचे म्हंटले जाते. मात्र ते पेशवेकालीन असावे, असे मत इतिहासतज्ञ व्यक्त करतात. मंदिरात तीर्थाची बारव खऱ्या खोट्या शपथांसाठी प्रसिद्ध आहे.



आजच्या संगणक युगाच्या काळातही सोमेश्वर मंदिराच्या बारवेत कोरलेल्या नागराजासमोर बसून खरे खोटे करण्यासाठी राज्यभरातून लोक येतात. श्रावणात सर्प स्वरुपात सोमनाथ प्रकटतात, अशीही येथील भाविकांची समजूत आहे. सोमवारी काकड आरतीला महिनाभर लोक उपस्थित असतात. सध्या सोमेश्वर सहकारी साखर कारखाना व पवार कुटुंबीय यांचे सहकार्यातून नुकताच १ कोटीचा जीर्नोधार करण्यात आला आहे. येथे येणारे भक्तांसाठी निवास, मंगल कार्यालय अशा सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. बाराही

महिने भक्तांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने आणखी १ कोटीची तरतूद करून, त्याबाबतचे काम चालू आहे. मंदिराशेजारील तळयाची खोली वाढविल्यामुळे सौंदर्यात भर पडली आहे. मंदिराला 'क' वर्गाचा दर्जा मिळाला आहे. मात्र मंदिराला 'अ' वर्ग दर्जा मिळणेसाठी ग्रामस्थ प्रयत्नशील आहेत. गुरव समाजाचे लोक इथे पुजारी आहेत. बारामती तालुक्यातील खोमणे आडनावाचे लोक सोमेश्वराच्या पालकीचे मानकरी आहेत. सोमेश्वरनगर पंचक्रोशीचे ते कुलदैवत आहे.



**<u>श्री क्षेत्र सोनेश्वर, सोनगाव</u>**

कऱ्हा व नीरा नदीच्या संगमावर बारामतीपासून १२ किलोमीटरवर अंतरावर सोनेश्वर हे तीर्थक्षेत्र आहे. कऱ्हा व नीरा नदीचा संगम पुढे भीमा नदीला नरसिंहपूर येथे मिळतो. भीमा नदी हि शिवरूप, नीरा विष्णुरूप व कऱ्हा ब्रम्हरूप समजली जाते. त्यांच्या निर्मितीच्या आख्यायिका पुराणात आहेत. कऱ्हा नदीच्या तीरावर विविध शिवलिंगे आहेत. हि महादेव मंदिरे काही सुस्थितीत व बरीच दुरवस्थेत आहेत. सासवड, जेजुरी, नारायणपूर, मेडद, मळद व सोनगाव अशा ठिकाणी हि मंदिरे आहेत. सोनेश्वर हे अकरावे मंदिर आहे. पूर्वी या ठिकाणी परिसाचा नंदी होता. सुवर्णलिंग आणि सोन्याचा कळस म्हणून त्यास सोनेश्वर म्हंटले जाते. नद्यांच्या संगमामुळे अध्यात्म साधनेसाठी हे ठिकाण योग्य मानले जाते. मंदिराचा जीर्णोद्धार केंद्रीय मंत्री शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विशेष लक्ष देवून २००३ पासून मंदिराच्या जीर्णोद्धारास सुरुवात केली. त्यानुसार छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या वतीने साडे सतरा लाख व पवार कुटुंबियांच्या वतीने साडे छत्तीस लाख रुपये देण्यात आले. या रकमेतून सुशोभीकरण, दीपमाळ, कीर्तन मंडप व घाटाचे पूर्ण काम करण्यात आले आहे. या ठिकाणी दर सोमवारी कीर्तन व भजनाचे कार्यक्रम होतात. श्रावण पौर्णिमेस उत्सव

साजरा केला जातो. तसेच महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. या ठिकाणी तीर्थस्थळाचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी अनेक भाविक भक्तांची मागणी होत आहे.

श्री क्षेत्र कन्हेरी

समर्थ रामदास स्वामींनी महाराष्ट्रीयन तरुणांमध्ये बलोपासनेची आवड निर्माण करण्यासाठी अनेक हनुमान मंदिरे उभारली त्यापैकी कन्हेरीचे मारुती मंदिर आहे असे महटले जाते. हरीभक्त पारायण काळे महाराज यांची ती कर्मभूमी त्यांनी कान्हेरी मारुती मंदिरात अखंड वीणा वादन व "ओम नमो भागवते वासुदेवाय" या मंत्राची सुरवात केली आहे, आजपर्यंत ती परंपरा पुढे चालवली जाते. काळे महाराजांनी कीर्तनकार निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले होते तेथील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी सोनापंत दांडेकर येत असत. काळे महाराजांच्या वास्तव्याने कान्हेरीचे मारुती देवस्थान जागृत आहे. बारामतीच्या पवार कुटुंबाचे ते श्रद्धास्थान असून डॉ.आप्पासाहेब पवार यांनी जन्म गावाचे ॠण फेडण्यासाठी हनुमान देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून या तीर्थक्षेत्राचा विकास झाला आहे. त्याठिकाणी सर्वधर्म ग्रंथालयाची स्थापना देखील ट्रस्ट माध्यमातून करण्यांत आली आहे. पंचक्रोशीतील गोर गरीब मुला मुलींचे विवाह कमी खर्चात व्हावेत या करिता ट्रस्टच्या वतीने एक मंगल कार्यालय सुरु करण्यात आले आहे. काळे महाराजांचा अध्यात्मिक वारसा पुढे चालवण्यासाठी अप्पासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली कान्हेरी संदेश नावाचे नियतकालिक ह.भ.प सरलाताई बाबर यांच्या संपादनाखाली सुरु करण्यात आले होते. अध्यात्मिक विचाराबरोबर ग्रामीण भागातील नवोदित कवी साहित्यिक यांना प्रोत्साहन देण्याचे कार्यही सुरु होते.



## प्रगत कृषी तंत्रज्ञानाचे "बारामती मॉडेल'

कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांमधील स्वतंत्रज्ञानाची आदानप्रदान करण्यासाठी "शिवारफेरी' हा उपक्रम सुरू केला. दर वर्षी ऊस, केळी, डाळिंब, अंजीर, सीताफळ, पशुपालन, भाजीपाला, हरितगृहातील शेती या विषयांवर ४० शिवारफेऱ्या आयोजित केल्या जातात. शास्त्रज्ञांकडून तंत्रज्ञानाची माहिती करून घेण्याबरोबर प्रत्यक्ष शेतकऱ्याने त्याच्या शेतीच्या गरजेनुसार विकसित केलेले स्वतःचे तंत्रज्ञानही इतर शेतकऱ्यांना माहिती व्हावे. शेतकऱ्यांना कमी खर्चाचे तंत्रज्ञान मिळावे, हा शिफारफेरीचा उद्देश आहे. त्यातूनच अनेक शेतकऱ्यांनी बिगरहंगामी कलिंगड, खरबूज, तसेच केळी, काकडी, बारमाही मका पिकांची सुधारित तंत्राने लागवड करण्यास सुरवात केली.

### ऍॅक्वा पोर्टल व एसएमएस, हवामान सल्ला -

१) शेतकऱ्यांना घरबसल्या सल्ला मिळावा हा उद्देश ठेवून कृषी विज्ञान केंद्रांतील उपलब्ध मनुष्यबळात जिल्हा व जिल्ह्याच्या बाहेरील शेतकऱ्यांपर्यंत पोचण्यासाठी आयआयटी पवई यांच्या सहकार्यातून "ऍॅक्वा पोर्टल' हे संकेतस्थळ सुरू झाले.

२) या संकेतस्थळाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पिकावर येणारे रोग, किडी, अन्नद्रव्यांची कमतरता या विषयीचे निदान व त्यावरील उपाययोजनांची तंत्रशुध्द माहिती कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून त्वरित मिळू लागली.

३) थोड्याच कालावधीत "ऍॅक्वा पोर्टल' देशातील विविध राज्यांत व परदेशातील शेतकऱ्यांनाही माहिती पुरवू लागले. यासाठी या पोर्टलला देशपातळीवरील "सुवर्णपदक' मिळाले. त्याच्या जोडीला कृषी विज्ञान केंद्राने एसएमएस सेवा सुरू केली आहे.

४) गेल्या काही वर्षांत मोबाईलचा वाढता वापर लक्षात घेऊन या तंत्रज्ञानाचा वापर कृषी माहितीच्या देवाण-घेवाणीकरिता होण्यासाठी केंद्रात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याच्या मोबाईलची नोंद सुरू केली. या शेतकऱ्यांना त्यांच्या गावात पडणारा पाऊस व इतर तांत्रिक माहिती निःशुल्क पुरवली जाते. आज या माहितीचा उपयोग सुमारे 60 हजार शेतकऱ्यांना होत आहे.

## ट्रस्ट ठरणार "सेंटर ऑफ एक्सलन्स'

इस्राईल, नेदरलॅंड, चीन, अमेरिका या देशांमधील शेती व शेतीपूरक व्यवसायातील अत्याधुनिक तंत्रज्ञान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना माहिती होणे अत्यंत गरजेचे आहे. हे तंत्रज्ञान एकाच छताखाली पाहावयास मिळणे तसेच त्याचे प्रशिक्षण मिळणे हा दुग्धशर्करा योग ऍग्रिकल्चरल डेव्हलमपेंट ट्रस्टमध्ये राजेंद्र पवार यांच्या संकल्पनेतून यापुढील काळात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होणार आहे.

शेती व शेतीपूरक व्यवसायातील अद्ययावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांना सहज वापरता येणे शक्य होईल, नवीन तंत्रज्ञानाचा वापर कमीत कमी खर्चात, कमी मनुष्यबळात करता येऊ शकेल याची माहिती देणारी प्रात्यक्षिक प्रक्षेत्रे ट्रस्टच्या शेतीफार्मवर उभारण्यात येत आहेत. याद्वारे शेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करून दर्जेदार उत्पादन मिळवावे हा "सेंटर फॉर एक्सलन्स' उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या केंद्राच्या माध्यमातून देशातील कृषी विद्यापीठांबरोबरच विविध देशांतील कृषी विद्यापीठे, कृषी व कृषीपूरक औद्योगिक कंपन्या व प्रशासकीय यंत्रणा एकत्र येऊन शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी काम करतील अशी यंत्रणा कार्यान्वित करण्याचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना उत्पादनापासून विक्रीपर्यंतचे संपूर्ण तंत्रज्ञान एका छताखाली मिळण्यासाठी हा प्रयत्न आहे. शासनाच्या योजना, परदेशातील तंत्रज्ञान याचे "बिझनेस मॉडेल' म्हणूनही कृषी विज्ञान केंद्र स्वतःचा वेगळा ठसा उमटवीत आहे.

## कृषी विज्ञान केंद्राची नवी इमारत

कृषी विज्ञान केंद्राची नवीन इमारत केवळ भव्यदिव्यच नाही, तर त्याचा उपयोग हा शेतकऱ्यांच्या आयुष्यात समृद्धीची बीजे पेरणारा असावा असाच प्रयत्न साधण्यात आला आहे. या केंद्रात शेतकऱ्यांना भविष्यकाळातील शेतीसाठी आधुनिक तंत्राचे प्रशिक्षण देणाऱ्या अद्ययावत यंत्रणा असणार आहेत. या यंत्रणा हाताळणारा कुशल व प्रशिक्षित तंत्रज्ञ येथे उपलब्ध आहे. यासाठी नेदरलॅंड, थायलंड, चीन, इस्राईल, अमेरिका येथील कृषी विद्यापीठे व कंपन्यांशी करार झालेले आहेत. शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देणारे केंद्र व्हावे, अशीच रचना करण्यात आली आहे.

## अद्ययावत माती-पाणी परीक्षण प्रयोगशाळा

कृषी विज्ञान केंद्राच्या माती-पाणी परीक्षण प्रयोगशाळेने आतापर्यंत राज्यात नावलौकिक मिळवलाच आहे. याखेरीज राज्यातील पहिली फिरती माती परीक्षण प्रयोगशाळाही येथे आहे. याच्या जोडीला आता सूक्ष्म, दुय्यम व मुख्य अन्नद्रव्यांची शिफारस करणारी प्रयोगशाळा येथे उभारली जात आहे.

## आंतरपिकांचे प्रात्यक्षिक क्षेत्रे-

शेती ही केवळ एका पिकांची राहता कामा नये, शेतकऱ्यांच्या आयुष्यात ती बदलाचे युग घेऊन येणारी असावी हा उद्देश ट्रस्टच्या स्थापनेपासूनच आहे. उसातील आंतरपिकांचे महत्त्व लक्षात घेऊन कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांना नवीन दिशा दिली आहे. उसामध्ये भात, कांदा, हरभरा, मका, तूर, सोयाबीन, हळद, कोबी, मूग अशा विविध आंतरपिकांचे प्रात्यक्षिक येथील प्रक्षेत्रावर पाहावयास मिळते.

## अत्याधुनिक पॉलिहाउस

भविष्याची गरज लक्षात घेऊन प्रक्षेत्रावर अत्याधुनिक हरितगृह येथे उभारण्यात आले आहे. संपूर्णतः स्वयंचलित तंत्र असलेल्या या हरितगृहांची रचना ही नेदरलँड व इस्राईल पद्धतीची आहे. यामध्ये जरबेरा, कार्नेशन, डच रोझ, रंगीत ढोबळी मिरची या पिकांची लागवड करण्यात आली आहे. या पिकांच्या व्यवस्थापनासाठी कमीत कमी पाणी, खते आणि मनुष्यबळाचा वापर केलेला आहे, तसेच जैविक पद्धतीने कीड नियंत्रण, लागवडीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान ते पॅकेजिंग तसेच काढणीपश्चात तंत्रज्ञानाची माहिती येथे मिळणार आहे.

ग्रीनहाउसमध्येही हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान वापरले आहे. जे भविष्यासाठी दिशादर्शक आहे. सध्या मातीविना शेतीची संकल्पना जगभरात मूळ धरू लागली आहे. हेच तंत्रज्ञान वापरून मातीचा वापर न करता फुलांची शेती करता येते हे दाखविणारा प्रकल्प येथे पाहायला मिळणार आहे.

## खत-पाणी व्यवस्थापनासाठी स्वयंचलित यंत्रणा -

कृषी विज्ञान केंद्राच्या ११० एकर क्षेत्रावरील पिकांना स्वयंचलित यंत्रणेद्वारे खत व पाणी व्यवस्थापन केले जाते. यातील तब्बल ७८ एकर क्षेत्र हे पूर्णतः संगणकावर आधारित आहे. लागवड पद्धत, पीक परिस्थिती, जमीन, हवामानावर आधारित सेन्सर प्रणालीच्या माध्यमातून पिकाला गरजेनुसारच पाणी व खत दिले जाणार आहे. तीस किलोमीटर अंतरातील हवामानाचा अंदाज घेऊन पिकांवरील संभाव्य कीड-रोगाचा होणारा प्रादुर्भाव वेळीच ओळखून त्यावर उपाययोजना करणारी यंत्रणा येथे आहे. या प्रक्रियेत विकसित करण्यात आलेल्या प्रणालीमध्ये पीकनिहाय पाणी व खत वापराच्या सूचना नियंत्रित करण्यात येतात. त्यानुसार ही प्रणाली पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करते. भविष्यातील नियंत्रित शेती कशी असेल याचे प्रात्यक्षिक येथे पाहावयास मिळणार आहे.

## सौरऊर्जेचा पुरेपूर वापर...

केंद्राच्या प्रक्षेत्रावरील शेततळ्यासाठीचा वीजपंप हा सौरऊर्जेवर चालणारा आहे. भविष्यात विजेच्या समस्येवरील उपाययोजना आतापासूनच कृषी विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांपुढे मांडली आहे. भविष्यातील शेतीची चुणूक दाखविणारा हा पथदर्शी प्रकल्प येथे पाहावयास मिळतो.

## पथदर्शी फळबागा -

ट्रस्टच्या प्रक्षेत्रावर इस्राईल तंत्रज्ञानाच्या आधारे ब्राझीलमधील संत्री, मोसंबीच्या नवीन जातींची लागवड झाली आहे. या जाती फळ प्रक्रियेसाठी उपयोगी आहेत. या जातींच्या माध्यमातून भविष्यात उपयोगी पडणाऱ्या पिकांची आणि वाणांची निवड कशी करावी लागेल हे शेतकऱ्यांच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न आहे. या व्यतिरिक्त कमी उत्पादन खर्चात अधिक उत्पादन देणाऱ्या आंबा, नारळ, चिंच, पेरू, आवळा, केळी, सीताफळाच्या पथदर्शी बागा येथे पाहावयास मिळतात.

## कृषी पर्यटन

विविध फळबागा, कृषी विषयक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केवळ शेतकरीच नव्हे तर शेतीचे आकर्षण असलेल्या शहरी पर्यटकांनाही शेतीचे महत्त्व दाखवून देण्यासाठी कृषी पर्यटन ही संकल्पना अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. बदलत्या काळात नव्या पद्धतीने भविष्यातील शेती शहरी लोकांनाही आकर्षित करणारी ठरावी, शेतीला चांगल्या गुंतवणुकीचा आधार मिळावा हाही यामागचा उद्देश आहे.

## पशुसंवर्धनातील नवं तंत्र...

१) प्रक्षेत्रावर इस्राईलच्या धर्तीवरील संकरित गाईंसाठी मुक्त संचार गोठ्यांची पद्धत, धार काढण्यासाठी "लो लाइन हेरिंग बोर्न' पद्धतीचे मिल्क पार्लर आहेत. गाईंच्या धारा काढण्यासाठी कमीत कमी मनुष्यबळासाठी ही उपाययोजना आहे.

२) यंत्राद्वारा काढलेले दूध थेट बल्क कुलरमध्ये साठविण्याची सोय आहे. मनुष्याचा कोठेही संबंध न येणारी ही यंत्रणा भविष्यातील दर्जेदार दूध उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. दुधामध्ये जंतूसंसर्ग व भेसळ रोखण्यासाठी ही यंत्रणा उपयोगी ठरणार आहे.

३) "हर्ड मॅनेजमेंट'च्या विशिष्ट प्रणालीद्वारा जनावरांचा आहार नियंत्रित करणारी यंत्रणा येथे कार्यान्वित करण्यात आली आहे. पशुप्रजनन व्यवस्थापनात प्रत्येक गाईचे वेत निश्चित करणारी आणि त्याआधारे गाईच्या प्रजनन स्थितीबद्दल तत्काळ माहिती मिळण्यास या प्रणालीची मदत होणार आहे.

४) जास्त वजनाची करडे देणाऱ्या दक्षिण आफ्रिकेतील बोअर जातीच्या शेळयांचे पैदास केंद्र येथे उभारण्यात आले आहे. चविष्ठ मांसासाठी प्रसिद्ध असणाऱ्या उस्मानाबादी शेळया, जुळी कोकरे देणाऱ्या नारी सुवर्णा जातीच्या मेंढ्या या विभागाचे आकर्षण आहे.

५) परसबागेतील गावठी कोंबड्यांप्रमाणेच पाळता येणाऱ्या; परंतु वार्षिक जास्तीत जास्त अंडी व मांस देणाऱ्या वनराजा जातीच्या कोंबड्यांचे पैदास केंद्र, वर्षभर हिरव्या चाऱ्याची उपब्धता करणारे मुरघास तंत्रज्ञान येथे पाहावयास मिळते.

## प्रक्रिया तंत्रज्ञान विभाग

सीताफळ, अंजीर, आवळा, चिंच, टोमॅटो, आंबा, मोसंबी, संत्री यावर प्रक्रिया करणारे तंत्रज्ञान येथे उपलब्ध आहे. याचे प्रशिक्षण महिला बचत गटांना दिले जाणार आहे. याद्वारे फळप्रक्रियेचे तंत्रज्ञान या भागात रुजविण्याचा ट्रस्टचा प्रयत्न आहे.

## बियाणे प्रक्रिया

बियाणे प्रतवारी व बियाणे प्रक्रियाची येथे यंत्रणा उपलब्ध आहे. शेतकरी बियाणे उत्पादक बनावेत या उद्देशाने ही यंत्रणा काम करते. आजवर शेकडो क्विंटल बियाणे या माध्यमातून उपलब्ध करण्यात आले. येत्या काळात त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ करून, ही भविष्यातील शेतीचा वेध घेणारी उद्योजक शेतकऱ्यांची कार्यशाळा असेल अशी रचना करण्यात आली आहे.

**कान्हाटी :** बारामती तालुक्याच्या जिरायती भागात हुरडा पार्ट्या जोरात सुरू आहेत.



शेतावरच पार्ट्या करण्यावर भर देत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

दर वर्षी नोव्हेंबरअखेर ते जानेवारी या काळात हुरडा पार्ट्या आयोजित केल्या जातात. रोजच्या धकाधकीच्या दिनक्रमातून सुट्टीच्या दिवशी निवांत क्षण शोधण्यासाठी सतत नवनवीन जागा शोधणाऱ्या शहरी पर्यटकांमध्ये हुरडा पार्टीची आवड आहे. सध्या बारामती-मोरगाव रस्त्यालगत अनेक ठिकाणी ज्वारीच्या शिवारांमध्ये हुरडा पार्ट्या रंगताना दिसतात आहेत. जिल्ह्यातून तसेच तालुक्यातून तरुण-तरुणींचे प्रमाण जास्त आहे. बारामती शहराबरोबरच पुण्यातील पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असतो. त्यासाठी शहरातून स्वतंत्र वाहन व्यवस्थेद्वारे हुरडा पार्ट्यांचा आनंद घेण्यासाठी पर्यटक बारामतीच्या जिरायती भागात पोहोचत आहेत.मुख्यत: सुट्ट्यांच्या दिवशी जास्त गर्दी असते. पर्यटकांना गरम गरम हुरडा, जोडीला लसूण-खोबरे, शेंगदाणा चटणी, सेंद्रिय गूळ, गोड दही असे दुपारी खायला देतात. थंडीच्या आल्हाददायक वातावरणात नेहमीच्या जेवणात बदल म्हणून लोक कृषी पर्यटन केंद्राला प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच हुरडा पार्ट्यांना मागणी वाढली आहे.

**वाघळवाडी**

या गावात गेली, २८ वर्षापासुन गावामध्ये तीन दिवसीय शिवजयंती महोत्सवाचे आयोजन केले जाते. अंबामाता ग्रामस्थ मंडळाच्या वतीने दरवर्शी राबविला जाणारा आणि बारामती तालुक्यात नावलौकीक असलेला शिवजयंती महोत्सव उत्साहात पारंपारीक आणि विविध सामाजिक उपक्रम तसेच ,सांस्कृतिक कार्यक्रमाचे प्रत्येक शिवजयंती महोत्सवात आयोजित करुन साजरा करतात. महाराष्ट्रातील अनेक किल्ले ,गड यावरुन किल्ले पर्यटन करुन शिवज्योत किल्यावरुन घेऊन येतात शिवजयंती महोत्सामध्ये तरुणाची ऐकी असल्याने काढण्यात येणारी शिवज्योतीची भव्य रँली हे या महोत्सवातील बारामती तालुक्यात प्रमुख आकर्षण ठरले आहे.





गावात मध्यभागी नव्याने जीर्णोद्धार केलेल्या श्री हनुमानाच्या मंदिरात देखण्या मारुतीरायाची मुर्ती आहे. हनुमान जन्मोत्सवा दिवशी गावातील यात्रा परंपरेनुसार हनुमान जन्मोत्सवा साजरा करतात. कामानिमित्त बाहेगावी असणारे गावकरी यात्रेनिमित्त सर्वजण एकत्र येतात .या दिवशी सर्वजण नवरात्र उत्सवामध्ये गावातील अंबामाता मंदिरात घटस्थापना करण्यात येते. **नवरात्र उत्सवात अष्ठमीला होमहवनाच्या कार्यक्रमाची अनेक वर्षापासुन चालत आलेली होमवनाच्या कार्यक्रमाची परंपरा गावकर्यानी जपली आहे**

## पुरंदर  तालुका

### सोन्याची जेजुरी : खंडोबाची जेजुरी महाराष्ट्रातील जागृत देवस्थान.

म्हाळसाकांत किंवा मल्हारी मार्तंड यांचे हे देवालय छोट्या टेकडीवर आहे. देवळाला ४५० पायऱ्या आहेत. असंख्य लोकांचे कुलदैवत म्हणजे जेजुरी.दसऱ्याला खंडोबाची तलवार उचलण्याचा विधी तसेच सोमवती अमावस्येची येथील जत्रा प्रसिध्द आहे. आता झी मराठीवर संध्याकाळी ७ वाजता लागणार्या जय मल्हार या मालिकेमुळे श्री क्षेत्र जेजुरीची सर्व माहिती आणि इतिहास महाराष्ट्रात घराघरात पोहचली आहे.  लग्न झाल्यानंतर नव दांपत्याने कुलदैवताचे दर्शन घ्यावे अशी प्रथा असल्यामुळे, नव्याने लग्न झालेली जोडपी श्री खंडोबाच्या दर्शनासाठी येथे गर्दी करतात.खंडोबाचा येऽऽळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार हा खंडोबाचा गजर महाराष्ट्रभर प्रसिद्ध असून, जेजुरी-गडावर दर्शन घेताना भंडारा (हळद) मोठ्या प्रमाणावर उधळला जातो. तर भेट देवुया अश्या भव्य दिव्य जेजुरी गडाला.

### श्री खंडोबा मंदिरातील मुख्य गाभारा

मंदिरा विषयी माहिती

उभ्या महाराचे कुल दैवत जेजुरीचा खंडोबा. काशीला ज्या प्रमाणे काळभैरवाची मुर्ति आहे तशी जेजुरीला मार्तंड भैरवाची मुर्ति आहे. मुख्य गाभाऱ्यात एकुण पाच मुर्तिंचे जोड आहेत. या सर्व मुर्तिंना उत्सव मुर्ति म्हणतात.

पहिला मुर्तिचा जोड शाहु महाराजांनी वाहिलेला आहे.दुसरा मुर्तिचा जोड पेशव्यांनी वाहिलेला आहे.तिसरा मुर्तिचा जोड शिवाजी महाराजांचे सावत्र भाऊ व्यंकोजी राजे भोसले यांनी वाहिलेला आहे.राहिलेल्या दोन जोडांन पैकी एक मराठे सरदार यांनी वाहिलेला आहे.तर दुसरा जेजुरी ग्रामस्थ यांनी वाहिलेला आहे.मुख्य गाभार्यात उजव्या हाताला शेज घर आहे तर डाव्या हाताला खंडोबा देवाचे गुप्त लिंग आहेत.वरती मंदिराच्या शिखरात खंडोबाचे प्रतिस्थापित लिंग आहेत या सर्वाचि रचना स्वर्गलोक-म्रुत्यूलोक व पाताळलोक अशा प्रकारे केली आहे या तिनही लिंगांचे दर्शन एकाचं दिवशी घ्यायचे असेल तर महाशिव रात्रीच्या दिवशी जेजुरीला यावे लागते.

सोमवारी सुर्योदय होत असताना जर अमावस्या असेल, तर त्यादिवशी खंडोबा मंदिरातील पालखी निघते. देव पालखीत ठेऊन कर्हा नदिवर अंघोळिसाठी जातात. वर्षातुन जवळ पास बारा यात्रा जेजुरी मध्ये भरतात.देवीचे जसे ९ दिवसांचे नौरात्र असते, तसे खंडोबाचे ६ दिवसांचे असते, त्याला आपण "चंपाष्ठी" किंवा "वांगे सट" असे म्हणतात. या काळात आतील दोन मुर्तिंचे जोड बाहेर घटस्थापनेच्या जागी आणुन ठेवतात. दोनही बाजूना चोवीस तास नंदा दिप जळत राहतात. मंदिरामध्ये सर्वत्र विद्युत रोषणाई केली जाते. दिपमाळा पेटविल्या जातात. सहा दिवस मोफद अन्नदानाचा कार्यक्रम पुजारी वर्ग आणि कर्मचारी यांच्या तर्फे मंदिरात चालू असतो. शेवटच्या दिवशी वांग्याचे भरित आणि बाजरीचा रोडगा यांचा नैवेद्य दाखवून कार्यक्रमाची सांगता केली जाते आणि जे मुर्तिंचे जोड बाहेर आणले आहेत ते पुन्हा मंदिरात नेले जातात.











## पंचलिंग मंदिर




जेजुरी गडावरील मुख्य खंडोबा मंदिरा इतकेच महत्वाचे असलेले पंचलिंग मंदिर, मुख्य मंदिराचे पाठीमागे पश्चिमेकडे आहे. मार्तंड भैरवाने दानवांवर मिळवलेल्या विजयानंतर धवलगिरीच्या एका टेकडीवर राहण्याचा संकल्प केला त्यावर धर्मपुत्र सप्तऋषींनी पाच तीर्थक्षेत्र दर्शन एकाच ठिकाणी व्हावे यासाठी स्वयंभू प्रकट व्हावे अशी विनंती केली. त्याप्रमाणे पंचलिंग मंदिरामध्ये नीलाद्री, वाराणसी, मातापूर,हरिद्वार, मल्हार अशा पाच तीर्थक्षेत्र दर्शनाचे पुण्य मिळते.

दगडी बांधकाम असलेल्या मंदिराचे सदर व गर्भगृह असे दोन भाग पडतात,मंदिराचे बांधकाम व जीर्णोद्धारा संदर्भात शिलालेख आढळतो त्याप्रमणे या मंदिराचे काम विठ्ठल शिवदेव विंचूरकर ( सासवडकर )यांनी १७५६ मध्ये केले आहे.ज्याला न घडे काशी, त्याने यावे जेजुरीशी अशी एक ओळ एका लोकगीतामध्ये आहे ती पंचलिंग मंदिरा संदर्भातील आहे, काशी इतकेचमहत्व या स्थानाला आहे. या मंदिरातील स्वयंभू लिंगावर अभिषेक पूजा केल्याने तीर्थाटनाचे पुण्य लाभते व कलियुगातील यातनांपासून मुक्ती मिळते अशी अनुभूती असल्याने भाविकांचा ओढा या मंदिरामध्ये धार्मिक विधी करण्याकडे जास्त असतो. पंचलिंग मंदिराच्या मागे खोल दरीत वाघेश्वरीचे मंदिर आहे.तसेच दरीत जानाईचे पुर्वाभिमुख मंदिर आहे.मंदिराजवळ विहिर असुन तिला जननीतिर्थ असे म्हणतात.

## कडेपठार

**जेजुरी गावाच्या नैऋत्य दिशेस साधारणपणे साडेतीन किलोमीटरवर जयाद्रीच्या पठारावर कडेपठार देवतालिंग हे श्रीखंडोबाचे स्थान आहे यालाच काहीलोक जुनागड असेही म्हणतात. जेजुरीपासून दोन किलोमीटर अंतरावर डोंगराच्या कुशीत विजाळ विहीर परिसर आहे, इथपर्यंत डांबरी सडक असल्याने गाडीने जाता येते तेथून पुढे पायरी मार्गाने दीड किलोमीटर अंतर चढून गेल्यावर मंदिरात पोहोचता येते. वाटेमध्ये हेगडी प्रधान मंदिर, राम**

मंदिर, भगवानगिरी मठ, गणेश मंदिर लागतात.मंदिराच्या मागे पंचलिंग मंदिर आहे.फोटोमध्ये बाणाबाईच्या मेंढ्या दिसत आहे. वरती जाताना पुर्वी सात वेस असल्याचे सांगितले जाते पण आता फक्त तीनच वेस शिल्लक आहेत.









<u>पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तलाव</u>

माहिती आणी ठिकाणे- उपाध्ये गुरुजी- जेजुरी मो. नंबर- ९८५०१५०७९७

पाण्याने तुडुंब भरलेला तलाव, मावळतीला निघालेला सूर्य आणि पश्चिमेकडून येणाऱ्या सोनेरी किरणांनी न्हाऊन निघालेला जेजुरगड, पक्षांचा किलबिलाट असे मनाला प्रसन्नता देणारे विहंगम दृश्य मनाचा थकवा नाहीसा करते. भाविक आणि पर्यटकांच्या दृष्टीने जेजुरीतील सायंकाळ निवांत घालविण्यासाठी अतिशय रमणीय ठिकाण म्हणून ज्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल तो पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर तलावाचा. .या तलाव्याचा निर्माण पुण्यश्लोक राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सन १७७० केला. हा तलाव लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांनी सासरे श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर(प्रथम) व सासू श्रीमंत गौतमीबाई होळकर यांच्या स्मरणार्थ निर्माण केला म्हणून या तलावास "मल्हार-गौतमेश्वर तलाव" या नावाने देखील ओळखले जाते.

श्रीक्षेत्र जेजुरी नगररचनेचा, जल व्यवस्थापनेतील महत्वाचा दुवा म्हणजे अठरा एकर क्षेत्रावर व्यापलेला होळकर तलाव, हा जलसाठा म्हणजे जेजुरी गावाच्या दृष्टीने अमृतकुंभच आहे. टेकडीच्या सोंडेवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या



या तलावावर जेजुरी गावाचा पाणी पुरवठा वर्षानुवर्षे अवलंबून होता, आणि आजही या तलावातून झीरपणाऱ्या पाण्यावर परिसरातील विहिरी व कूपनलिकांना पाण्याची कमतरता कधीच भासत नाही. जेजुरी गावाच्या नैऋत्य दिशेकडील डोंगरातून ओढ्याद्वारे वाहत येणाऱ्या पाण्यावर इसवी सन १७७० मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी हा तलाव व जननी तीर्थ बांधले, त्या सोबतच तलावाच्या पूर्व-उत्तर बाजूस देवपूजेसाठी फुलबाग निर्माण केली तर दक्षिण बाजूस चिंचेच्या झाडांची बाग तयार केली ज्याचा उपयोग यात्रा काळातील भाविकांच्या निवाऱ्यासाठी होतो. संपूर्ण दगडी बांधकाम असलेल्या तलावाला पाच ठिकाणांवरून खाली उतरण्यासाठी बांधीव पायऱ्या आहेत तर दोन ठिकाणी मोटेद्वारे पाणी उपसण्याची थारोळी आहेत.तलावाच्या पूर्वेकडील भिंतीमध्ये नळाद्वारे पाणी पुरवठ्याचे नियंत्रण करणाऱ्या

दटव्याची व्यवस्था आहे, तलावाचे पाणी भूमिगत नळाद्वारे गावातील तीन हौदाना व गायमुखाला पुरविले जात होते.

## मल्हार गौतमेश्वर छत्री मंदिर

सुभेदार मल्हारराव होळकर म्हणजे क-हे पठारावर वाढलेले व रेवा तीरावर बहरलेल




रांगडे व्यक्तिमत्व.शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा विस्तार करणाऱ्या मराठे शाहीतील एक प्रमुख सरदार म्हणून मल्हाररावांनी नावलौकिक तर मिळवलाच याउपर उत्तर हिंदुस्थानच्या राजकारणात दरारा निर्माण केला होता. माळव्याची सुभेदारी मिळाल्यानंतर येणाऱ्या उत्पन्नातून जेजुरीच्या कुलस्वामी मल्हारी मार्तंडाच्या मंदिराचे भव्य बांधकाम करण्याचा घाट घातला व हे काम वर्षानुवर्षे चालूच होते अशा लढवय्या वीर मल्हाररावांचा मृत्यू मोहिमेवर असताना आलमपूर येथे २० मे १७६६ रोजी झाला. त्यांच्या पत्नी द्वारकाबाई व बनाबाई सती गेल्या. ज्यागावी त्यांचा मृत्यू झाला त्या आलमपूरचे नाव बदलून मल्हारनगर असे ठेवण्यात आले. तेथे

मल्हाररावांची  छत्री बांधण्यात आली व समोरच मार्तंडाचे मंदिर बांधण्यात आले. परंतु मल्हारराव होळकरांचे जेजुरीविषयी असलेल्या प्रेमापोटी त्यांच्या गादीचे तिसरे वारस तुकोजी होळकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मार्गदर्शना खाली जेजुरी येथे मल्हार गौतमेश्वर छत्री मंदिर उभे केले.

पूर्वाभिमुख असलेल्या छत्री मंदिराचे बांधकाम अतिशय प्रमाणबद्ध व रेखीव असून मंदिराचे मंडप व गर्भगृह असे दोन प्राकार आहेत पैकी मंडपाचे छत घुमटाकार आहे व त्यावर आतील बाजूने चित्रे रंगविली आहेत. मंडपामध्ये वातानुविजनासाठी सुरेख कोरीव काम केलेल्या दगडी खिडक्या आहेत. गर्भगृहात लाकडी मेघडंबरीमध्ये खालील बाजूस संगमरवरी शिवलिंग असून मागील कट्ट्यावर मध्यभागी सुभेदार मल्हारराव होळकरांची संगमरवरी बैठी मूर्ती आहे,तर त्यांच्या दोन्ही बाजूला त्यांच्या पत्नी गौतमाबाई व बनाबाई यांच्या मूर्ती आहेत.

मंदिरासमोर चौथऱ्यावर कोरीव नंदीचे भव्य शिल्प आहे, नंदीच्या गळयातील घंटा, साखळी व झुलीवरील नक्षी सुबकरित्या कोरलेली आहे.

## लवथळेश्वर मंदिर




जेजुरी गावठाणा पासून एक किलोमीटर अंतरावर असलेलेलवथळेश्वर मंदिर म्हणजे महादेवाचे जागृत स्थान असे मानले जाते. या स्थानाविषयी मार्तंड विजय ग्रंथामध्ये महत्म्य सांगितले आहे, दुर्वास ऋषींचा लवा नामक शिष्य होता त्याला स्वतःला आपल्या तप साधनेमध्ये व्यत्यय येवू नये असे वाटत होते, ही बाब त्यांनी आपल्या गुरूच्या कानी घातल्यानंतर, दुर्वास ऋषींनी शिष्याच्या तपश्चर्येसाठी हा परिसर दानव-शाकिनी-डाकिनी-भूत-पिशाच्च यांच्या संचारापासून अभिमंत्रित करून मुक्त केला, तोच हा लवथळेश्वर परिसर. पुढे कृतयुगामध्ये मणीचूलपर्वतावरील सप्तऋषींना मणीमल्ल दैत्यांपासून आपली कुटुंबे सुरक्षित ठेवण्यासाठी नारद मुनींनी याच परिसरामध्ये धेवण्याचे सुचविले. समर्थ रामदास स्वामींना या मंदिरामध्ये श्रीशंकराची 'लवथवती विक्राळा' ही आरती स्फुरल्याचे सांगितले जाते.

मंदिर जमिनीपासून खाली आतमध्ये असल्याने बाहेरून सहजपणे लक्षात येत नाही.मंदिरामध्ये उतरण्यासाठी पूर्वेकडीलबाजूने पाच सहा पायऱ्या आहेत त्यांच्या उजव्या अंगावर एक अस्पष्ट सात ओळींचा शिलालेख दिसतो, त्यावर शके १५३० हे साल दिले आहे. मूळ मंदिर उत्तराभिमुख आहे प्रवेश द्वाराबाहेर कोनाड्यांमध्ये देव देवतांच्या मूर्ती आढळतात. मंदिरामध्ये प्रवेश केल्यानंतर उजव्या हातास गणेश मूर्ती व नाग मूर्ती आहे.त्याच्या शेजारीच पश्चिमेकडे एक दरवाजा असून तो 'लवतीर्थ' मध्ये जाण्या चा मार्ग आहे. गणपतीच्या समोरच पाठमोरा मोठा नंदी आहे. नंदी समोर मुख्य गर्भगृहात अडीच फुट उंचीचा जाण्याचा मार्ग आहे. मुख्य गर्भगृह दोन ते तीनच लोक मावू शकतील एवढेअतिशय छोटे असून तेथे लवा ऋषींनी स्थापित केलेले सुंदर शिवलिंग आहे.

## पेशवे तलाव






पेशवाई मध्ये जेजुरीचा, पुण्याप्रमाणेच कायापालट झाला, होळकरांचे त्यातील योगदान मोठे आहेच, परंतु त्याबरोबरच अनेक सरदार घराण्यांनी सुद्धा याला हातभार लावला. अखेरचे पेशवे बाजीराव रघुनाथ उर्फ दुसरा बाजीराव यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये जी काही थोडीफार समाजोपयोगी कार्ये केली त्यापैकीच एक म्हणजे खंडोबा मंदिराच्या अग्नेयेकडील पायथ्याला रमणा परिसरातील ओढ्यावर पाणी साठवण्याचा तलाव बांधला. या तलावाचे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरण्याची व्यवस्था केलेली आहे. तलावाची पाणी साठवण क्षमता खूप मोठी आहे परंतु 'पाणी संकलन क्षेत्र' मर्यादित असल्याने तलाव पूर्ण क्षमतेने कधीही भरत नाही. या तलावाचे खास वैशिष्ठ्य म्हणजे पूर्वेकडील बांधकामामध्ये पाणी वितरण करण्यासाठी दट्ट्याची व्यवस्था आहे व प्रथम दर्शनी सहज लक्षात न येणारे बल्लाळेश्वर मंदिर या भिंतीच्या पोटात आहे. तलावाच्या मध्यभागी एक गोलाकार विहीर आहे तलाव जरी आटला तरी यामध्ये भरपूर पाणी असते, मध्यंतरी दुष्काळी परिस्तिथी मध्ये जेजुर गडावर येथूनच पाणी पुरविले जात होते.



## शंकरेश्वर

जेजुरी गावाच्या नैऋत्येला साकुर्डे नामक गाव आहे तेथून पुढे जायाद्रीच्या डोंगर रांगांमध्ये धावडदरा मोरदरा व देवदरा निसर्गरम्य अशा दऱ्या आहेत. त्यापैकीच देवदऱ्या मध्ये शंकरेश्वर रामेश्वर व बोंबलेश्वर ही स्थाने आहेत. यापैकी शंकरेश्वराचे मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे हे दक्षिणाभिमुख आहे व आतील शिवलिंगाची पर्णिका पूर्वेकडे आहे

असे शिवमंदिर एकमेवद्वितीय असावे असे वाटते. सप्तऋषींनी मणीचूल पर्वतावरील आपला कुटुंब कबिला येथे आणून ठेवला होता असे मार्तंड विजय ग्रंथ सांगतो. त्यातील एका टेकडीवर एक गणेश मंदिर आहे त्यालाच बोंबलेश्वर म्हणतात.





## हुतात्मा स्मारक

मा.ए.आर.अंतुले, मुख्यमंत्री पदी असताना महाराष्ट्र शासनाने, १९८३ सालीएक महत्वपूर्ण निर्णय घेतला, स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्मा झालेल्या महापुरुषांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांच्या गावी अथवा त्यांना वीरमरणज्याठिकाणी आले तेथे हुतात्मा स्मारक उभारायचे. महाराष्ट्र शासनाच्या या स्तुत्य उपक्रमांतर्गत श्रीक्षेत्र जेजुरी येथे गावातून जाणाऱ्या आळंदी- पंढरपूर पालखी महामार्गालगत क्रांतिवीर हरी मकाजी नाईक यांचे स्मारक बांधण्यात आले आहे. रामोशी समाजातील उपेक्षित राहिलेल्या क्रांतीवीराच्या स्मृतींना उजळा मिळण्यास या स्मारकामुळे काही अंशी हातभार लागला.आता पालिकेने याठिकाणी बाग तयार केली आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षात स्मारकाची रंगरंगोटी झाली, नव्याने काही दिवे लागले. क्रांती ज्योतीचा स्तंभ आणि अष्टकोनी सभागृह असे या वस्तूचे स्वरूप असून सभोवताली हिरवळ आणि झाडे मन प्रसन्न करतात.

येथे हुतात्म्यांच्या स्मृती जागवणारे कोणतेही कार्यक्रम होत नाहीत. वास्तू टिकवून ठेवण्याचा उपचार पाळण्यात आजवर सा-यांनी धन्यता बाळगल्याने या स्मारकांची पडझड अद्याप झालेली नाही. भलेबुरे प्रसंग झेलत रौप्यमहोत्सव पूर्ण करणारे हे स्मारक देशभक्ती व राष्ट्रप्रेमाचे दर्शन घडवणारे केंद्र बनू शकले नाही. याला केवळ प्रशासनच नाही तर सारेच आपण जबाबदार आहेत.

श्रीखंडेरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांनी आणि पर्यटकांनी आवर्जून या हुतात्मा स्मारकास भेट देऊन दोन घटका वेळ घालविण्यास काहीच हरकत नाही.

## हेगडी प्रधान






मणीसूर व मल्लासूर या दैत्यांच्या युद्धावेळी मार्तंड भैरवाने विष्णुना आपले प्रधान म्हणून नेमले होते व मणीसूर दैत्य धारातीर्थी पडल्यानंतर त्याने केलेल्या स्तुतीमुळे मार्तंड भैरव प्रसन्न झाले व त्यांनी विष्णुना देवसेनेतर्फे मल्लासूराकडे शिष्टाई करण्यासाठी पाठविले होते. विष्णूनी केलेल्या शिष्टाईला यश आले नाही व पुढे युद्धामध्ये मार्तंड भैरवाचे हातून मल्लासूराचा संहार झाला.विष्णूंचे अर्थात हेगडी प्रधानाचे मंदिर जेजुरगडावरील पायरी मार्गाच्या मध्यावर लागते.मंदिर साध्या बांधणीचे विना कळसाचेदगडामध्ये बांधलेले आहे.

या मंदिरामध्ये विष्णूंच्या दोन मूर्ती आहेत त्यावरून अनेकांना वाटते हेगडे व प्रधान दोन स्वतंत्र असावेत परंतु सत्यात प्रधान या शब्दाचे कानडी रूप म्हणजे हेगडे होय. ज्याप्रमाणे चांगभलं हे एकाच अर्थाच्या दोन शब्दांचे एकत्रीकरण करून त्यांचा एकच शब्द रूढझाला आहे तसेच हेगडे + प्रधान यांचे बाबतीत हेगडी प्रधान हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. श्रीखंडोबा म्हाळसाईचे दर्शन घेण्यापूर्वी हेगडी प्रधानाचे दर्शन घेणे महत्वाचे मानले जाते.

## यशवंतराव




गडकिल्ल्यांच्या उभारणी करताना त्यांच्या रक्षणासाठी यशवंतरावची निर्मिती केलेली असते तसेच जेजुर गडावरील महाद्वाराशेजारी तट बंदीत उभे असलेले महत्वाचे ठिकाण म्हणजे यशवंतराव. येथे वरच्या बाजूला दोन इंच व्यासाचे एक छिद्र आहे त्याविषयी आख्यायिका सांगितली जाते, औरंगझेबाने जेजुर गडावर स्वारी केल्यानंतर या छिद्रातून मोठे भुंगे बाहेर पडले व त्यांनी मोगलांवर हल्ला

चढविला होता, तेव्हा औरंगझेबाने श्रीखंडोबाची माफी मागितली व सव्वा लाखाचा भुंगा वाहिला. या संदर्भातील रामदास स्वामींच्या एका पदामध्ये याचे वर्णन आलेले आहे, ते असे

महीपति कळेना गति पाहो जाता सामर्थ्य किती |

करामती दावी अजामती ।।

तुरुक मातले फोडाया गेले । भोंगे उठिले तेही पिटिले ।

कोणे नेणो मार्गी कुटिले ।।

श्वानासारिखी एक भुंकती । तोंडे वांकडी कंप सूटती ।

पिसाळले, विष्ठ भक्षिती ।।

हत्ती घोडे बहु मारिले । थोर लोक भूमी काढिले ।

तांति वाहणा बाजीद जाले ।।

ऐसी हे लीळा कळे नकळा । कळा विकळा धाक सकळा ।

थोर थोर म्हणती पळा ।।

मल्लुखान देव मल्लारि । रात्रिभागी चाबुक मारी ।

तोंडे सुजती पैजारांवरी ।।

गर्व जाता ते बराबरी । संतोषता न्याहाल करी ।

दास म्हणे करा चाकरी ।।

दुसऱ्या आख्यायिकेनुसार यशवंतराव गडाचे किल्लेदार आहेत व देवाच्याभेटीसाठी येणाऱ्या भाविक भक्तांचे शारीरिक वेदना दूर करण्याची त्यांची शक्ती आहे. म्हणूनच भाविक याठिकाणी मोडलेल्या हात पायांचे दुखणे बरे होण्यासाठी नवस बोलतात व नवस पुर्तीनंतर लाकडी हात अथवा पाय तयार करून यशवंतरावला अर्पण करतात.

## गुप्त मल्लेश्वर ( गुप्तलिंग )



मार्तंड भैरवाने बाणाई सोबत विवाह केला व चोरून तिला जेजुरगडावर तळघरामध्ये आणून ठेविले होते.तेथून ते महाशिवरात्रीला प्रकट झाले.अशी कथा गुप्त मल्लेश्वराविषयी "मार्तंड विजय" ग्रंथात सांगितली आहे. मुख्य मंदिरातील गर्भगृहामध्ये उजवीकडे व डावीकडे दोन खोल्या आहेत त्यापैकी डावीकडील खोलीत देवाचे शेजघर आहे तर उजवीकडील खोली बाहेरून रिकामी दिसते परंतु या खोलीमध्ये तळघर असून या तळघरामध्ये श्रीखंडोबा व बाणाईचे स्वयंभू लिंग आहे. हे गुप्तलिंग वर्षातून फक्त एकदाच महाशिवरात्री उत्सवामध्ये उघडले जाते एरवी ते बंदच असते. असेच एक लिंग शिखरामध्ये आहे तेसुद्धा महाशिवरात्रीलाच उघडते.

महाशिवरात्रीला जेजुरी येथे आल्यानंतर पाताळलोक, भूलोक व स्वर्गलोक या त्रैलोक्यामध्ये व्यापलेल्या परमेश्वराचे लिंगरूपाने दर्शन होते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

## भुलेश्वर मंदिर

**जेजुरीच्या गडावरच छत्रपती शिवाजी व शहाजीराजांची महत्त्वपूर्ण भेट झाली होती. ज्यामध्ये मोगलांविरुध्द लढण्यासाठीची प्रेरणा छत्रपतींना वडिलांकडून मिळालीअद्‌भूत**



**शिल्पकृतींचे भुलेश्वर मंदिर**

**- आशुतोष गोडबोले**

**पुण्यापासून पन्नास किलोमीटर अंतरावर असलेले भुलेश्वर हे ठिकाण तेथे तेराव्या शतकात बांधण्यात आलेल्या शंकराच्या प्राचीनमंदिरासाठी ओळखले जाते. देवगिरी राजांच्या कालखंडात हेमाडपंथी मंदिरे मोठ्या संख्येने बांधण्यात आली होती. भुलेश्वरचे मंदिर इ.स. 1230 मध्ये निर्माण करण्यात आले असे मानले जाते. त्या मंदिरातील शिल्पे हाशिल्पसौंदर्याचा उत्तम आविष्कार आहे. भुलेश्वरच्या मंदिरात स्त्रीरुपातील गणेशमूर्तीचे दुर्मिळ शिल्प पाहता येते.**

भुलेश्वरचे मंदिर पुरंदर तालुक्यातील माळशिरस गावाजवळ आहे. ते मंदिर दौलतमंगल या किल्ल्यामध्ये सामावलेले आहे. पुणे शहराच्या दक्षिणेकडे असलेली सह्याद्री पर्वताची उपरांग 'भुलेश्वरची रांग' म्हणून ओळखली जाते. ती रांग पूर्व-पश्चिम अशी पसरलेली आहे. त्या रांगेत सिंहगड आणि मल्हारगड यांच्या सोबतीने दौलतमंगल किल्ला उभा आहे. त्या किल्ल्याचे काही बुरूज आणि प्रवेशद्वार वगळता केवळ भग्नावशेष उरले आहेत.

भुलेश्वर मंदिराबाबत एक दंतकथा प्रसिद्ध आहे. देवी पार्वतीने भगवान शंकरासाठी नृत्य केले आणि महादेवांना पार्वतीची भुरळ पडली. त्यानंतर त्यांचा हिमालयात विवाह झाला. महादेवाला पार्वतीच्या सौंदर्याने भूल पाडली, म्हणून ते ठिकाण भुलेश्वर नावाने ओळखले जाऊ लागले.

भुलेश्वरचे मुख्य मंदिर भव्य असून ते एका पठारावर उभारले आहे. मंदिराची उभारणी जमिनीपासून उंच चौथऱ्यावर केली आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. संपूर्ण मंदिर दगडात कोरण्यात आले आहे. मंदिराच्या चौथऱ्यावर प्रवेश करायच्या आधी पाय-यांजवळ असलेल्या द्वारपालांच्या मूर्ती लक्ष वेधून घेतात. मूर्तींच्या शरिरावरील दागिन्यांचे कोरीवकाम आकर्षक आहे. उजव्या बाजूच्या मूर्तीशेजारी वाघ हत्तीवर आक्रमण करत आहे असे शिल्प कोरलेले आहे. मुख्य मंदिरासमोर मोठी पितळी घंटा टांगलेली आहे. मंदिरासमोर प्रशस्त फरसबंद आवर आहे. आवारातून दर्शनी मंडपात प्रवेश करण्यासाठी तिन्ही बाजूना प्रवेशद्वारे आहेत. त्या दगडी मंडपात दरवाजे आणि जाळीदार गवाक्षांच्या सहाय्याने हवा खेळती ठेवली आहे. आतील बाजूस उत्तुंग घुमटाकृती रचना असल्याने दगडातला थंडावा उन्हाळ्यातही टिकून असतो.

भुलेश्वरच्या मंदिराची वास्तुशैली दक्षिणेकडील होयसळ मंदिराप्रमाणे आयताकृती आणि पाकळ्यासदृश्य आहे. इतर हेमाडपंती मंदिरांच्या तुलनेत भुलेश्वर मंदिरातील शिल्परचना उच्च प्रतीची आहे. पूर्वाभिमुख असलेल्या त्या मंदिराच्या बाहेरील प्राकाराची रचना उत्तरेतील जैन मंदिरांच्या धर्तीवर आहे. अर्धखुला मंडप, मधला भाग आणि मुख्य गाभारा असा त्या मंदिराचा परिसर आहे. तेथील शिवमंदिरास भुलेश्वर-महादेव किंवा यवतेश्वर म्हणतात. मंदिराच्या गाभाऱ्यातशिवलिंग आहे. मंदिराच्या सभोवतालची भिंत,

नगारखाना व शिखरे अठराव्या शतकातील मराठा शैलीतील आहेत. पूर्वी, मूळ मंदिरास भव्य प्राकार होता व नंदीचा मंडप स्वतंत्र होता. अठराव्या शतकात झालेल्या जीर्णोद्धारानंतर हे मंदिर एकाच छताखाली आले.

मंदिरात मोठ्या प्रमाणात मानवी व देवतांची शिल्पे आहेत. देवळाभोवती असलेल्या ओवऱ्यांमध्ये देवतांच्या अनेक मूर्ती आहेत. काही ओवऱ्या रिकाम्या आहेत. भिंतींवर कोरीवकाम, मूर्तीकाम केलेले आहे. मुख्य सभामंडपाच्या भोवती असलेल्या अर्धभिंतींवर युद्धप्रसंग, सिंह, हत्ती इत्यादी प्राणी व रामायण-महाभारतातील प्रसंग कोरलेले आहेत. महाभारतातील प्रसंग भारतातील इतर मंदिरांपेक्षा तेथे जास्त रेखीव आहेत. द्रौपदी-स्वयंवर, शरपंजरी भीष्म, हत्तीला आकाशात फेकणारा भीम ही कथानकशिल्पे, तसेच मातृकादेवी, गणपती, विष्णूंचे अवतार, योद्धे, पक्षी इत्यादी विविध प्रकारचे शिल्पांकन त्या मंदिरात आढळते. कुंभ, कमळ कीर्तिमुख, मकर, पाने-फळे, वेलबुट्ट्या, घंटा ही शुभचिन्हे मंदिराच्या सुशोभनात वापरलेली आहेत. तेथील दर्पणधारी स्त्रीमूर्ती शिल्पकलेचा सुंदर नमुना आहे. दक्षिण दरवाज्यावर असलेल्या भरत-शत्रुघ्नाच्या डाव्या बाजूस दोन चौघडावाले उंट दाखवलेले आहेत. दक्षिणेकडील मंदिरात उंटाचे शिल्प क्वचितच आढळते. माळव्यात प्रचलित असलेल्या भूमिज उपशैलीचा प्रभाव तेथील काही शिल्पांवर ठळक रीत्या आढळतो. यादव साम्राज्य संपुष्टात आल्यानंतर यवनांकडून महाराष्ट्रातील अनेक मंदिरांची, शिल्पांची नासधूस करण्यात आली. भुलेश्वर मंदिरातील शिल्पांचेही त्या काळात नुकसान झाले.

विजापूरचा सरदार मुरार जगदेव याने भुलेश्वराच्या डोंगरावर ‘दौलत मंगल’ नावाचा किल्ला १६३४ मध्ये बांधला (संदर्भ - शिवचरित्र प्रदीप - १९२५). त्या किल्ल्याचा भग्न बुरूज मंदिराकडे जाताना उजव्या बाजूस दृष्टीस पडतो. त्यासोबत तटबंदी, ताशीव दगडात बांधलेला किल्ल्याचा दरवाजा, पाय-यांचे मार्ग, पायाचे टाके पाहायला मिळतात. पहिले बाजीराव पेशवे व साताऱ्याचे शाहू छत्रपती यांचे गुरू ब्रह्मेंद्रस्वामी यांनी अनेक हेमाडपंथी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. भुलेश्वरचे मंदिर त्यापैकी एक. स्वामींनी १७३७ मध्ये एक लाख रुपये खर्चून तीन कमानींचा नगारखाना, सभामंडप व तीन चुनेगच्ची शिखरे बांधली. ते बांधकाम संभाजी व व्यंकोजी नाईक या गवंड्यांनी केले. देवळाच्या बांधकामात स्वामी जातीने लक्ष पुरवत असत. दमाजी गायकवाड या सरदाराने पवारांवर मिळवलेल्या

विजयाप्रीत्यर्थ जीर्णोद्धारास पंचवीस हजार रुपये दिले. वसईच्या विजयानंतर चिमाजी अप्पांनी भुलेश्वरास मुकुटाकरता सव्वाशे रुपये व सोन्याच्या सव्वाशे पुतळया अर्पण केल्याची नोंद आहे. ब्रह्मेंद्रस्वामींनी माळशिरस व यवत या ठिकाणी विहिरी व तळी बांधून दिली. तेराव्या शतकात बांधलेल्या त्या मंदिराचे प्रवेशद्वार शिवकालिन गोमुखी प्रकारचे असल्यामुळे मंदिराचा जिर्णोद्धार झाला असल्याचे स्पष्ट होते. त्या जीर्णोद्धारामुळे ते मंदिर हेमाडपंथी-मराठा संमिश्र वास्तुशैलीचे झालेले आहे.

मंदिराचे गर्भगृह खोल असून गर्भगृहासमोर उंचावर काळया दगडातील कोरीव काम केलेला नंदी आहे. नंदीच्या उजव्या बाजूस ओटा असून त्यावर कासवावर बसलेला नंदी असावा. हल्ली त्याचे फक्त डोके शिल्लक असल्यामुळे तो प्राणी कोणता असावा ते कळत नाही. गर्भगृहातील शिवलिंगाच्या संगमरवरी बाणावर पितळी मुखवटा बसवलेला आहे. बाण काढल्यानंतर खाली आत तीन मुख्य लिंगे, तीन कोपऱ्यांत उंचवट्याच्या स्वरूपात असून ती ब्रह्मा, विष्णू व महेश यांची प्रतिके आहेत. पिंडीच्या खाली असलेल्या खोलगट भागात नैसर्गिक रीत्या पाणी पाझरत असते. अन्य शिवमंदिरांपेक्षा भुलेश्वर येथे अनेक




वैशिष्ट्ये आढळतात. कीर्तिमुख, उंबरठ्यांच्या मध्यभागी न काढता दोन्ही अंगांस कोरलेली आहेत. गाभाऱ्याच्या गणेशपट्टीवर गणपतीचे चित्र असले तरी देवळाभोवती असणाऱ्या दक्षिणाभिमुख पट्ट्यांवर गणेशाऐवजी भैरवाचे शिल्प कोरलेले आहे. ओवऱ्या व दगड यामध्ये कोरलेल्या खिडक्या यांची एकाआड एक मांडणी केलेली आहे.

मंदिराच्या गाभाऱ्याच्या बाहेरील बाजूस वर तीन सप्तमातृकांच्या समूहात गणेशाचे स्त्रीरूपी दुर्मीळ शिल्प आहे. वेरूळच्या कैलासलेण्यात त्या प्रकारचे शिल्प आढळते. प्राचीन वाङ्मयात व स्कंदपुराणाच्या पंधरा हजार श्लोक असलेल्या काशिखंडात चौसष्ट योगिनींच्या यादीत या गणेशाचा 'वैनायकी' असा उल्लेख आढळतो. देवीसहस्रनामात त्या देवतेस 'विनायकी, लंबोदरी, गणेश्वरी' अशा विशेषणांनी संबोधले आहे. 'शिल्परत्न' या ग्रंथात वैनायकीचा उल्लेख 'शक्तिगणपती' असा केलेला आहे. गुप्तकाळात प्रथम सप्तमातृका

शिल्पाचा उगम झाला. मध्ययुगात शक्तिपूजक संप्रदायात वैनायकी पूजनाचे महत्व वाढले. वैनायकी शिल्पे गजमुख, चतुर्भुज आणि गणपती यांच्याप्रमाणे आयुधे धारण केलेली आढळतात. भुलेश्वर येथील वैनायकी शिल्पे पद्मासनात बसलेली असून सालंकृत आहेत. खाली मूषक हे वाहन आहे. तेथे वेरूळच्या लेण्याप्रमाणे पूर्ण शिल्पपट्टीका नसून तीन सप्तमातृकांच्या शिल्पपट्टीत वैनायकीची शिल्पे आहेत.

भुलेश्वरला पोचण्यासाठी पुणे-सोलापूर महामार्गाद्वारे उरुळी कांचन, लोणी काळभोर मार्गे यवतजवळ यावे. यवतच्या अलिकडे उजवीकडे भुलेश्वर आणि माळशिरस यांच्याकडे जाणारा फाटा आहे. त्या रस्त्याने घाट चढून आठ किलोमीटर गेले, की पठारावर सपाटीकडे जाणारा रस्ता सोडून उजवीकडे चढावर दूरध्वनी मनोऱ्याच्या शेजारीच भुलेश्वराचे मंदिर आहे.

मंदिराच्या आत छायाचित्रणास बंदी आहे. महाशिवरात्रीला तेथे भाविकांची गर्दी होते. पुरंदर तालुक्यातील माळशिरस गावातून श्रावण महिन्यात मंदिरात भुलेश्वराची पालखी नेली जाते.पुरातत्त्व खात्याने ते मंदिर राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.

## पुरंदर तालुक्याजवळील पर्यटन स्थळे

### <u>सासवड</u>

सासवडला जाण्यासाठी भोरहून राष्ट्रीय महामार्गाने कापूरव्होळला जावे लागते. बालाजी, नारायणपूर मार्गे सासवडला जाता येते. हे अंतर सुमारे ४० कि.मी. आहे. सासवडला जाण्यासाठी सुमारे एक तास लागतो. पुण्याहून हडपसर मार्गे दिवेघाटातून, सासवडला जाता येते.

### <u>पुरंदर- वज्रगड किल्ला</u>

अभेद्य खडकांवरचा, समुद्रसपाटीपासून 1398 मी. उंचीवरचा चौदाव्या शतकातील हा किल्ला बालेकिल्ला आणि माची अशा दोन भागात आहे. गडावरील दिल्ली दरवाजा, तटबंदी, केदारेश्वराचे मंदिर पाहण्यासारखे आहे. मुरारबाजीच्या शौर्याने पावन झालेली इथली माती वंदनीय आहे. स्वातंत्र्यानंतर इथे भारतीय सैन्याचे प्रशिक्षण केंद्र कार्यरत होते. छत्रपती संभाजी राजांचे तसेच सवाई माधवरावांचे हे जन्मस्थान.

बालाजीचे मंदिर  पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावरील केतकावळे या गावी जगातील सर्वात मोठी (तिरुपती येथील) बालाजी मंदिराची प्रतिकृती वेंकटेश्वरा उद्योगसमूहाने उभारली आहे. १० एकरांवरील या मंदिराचे बांधकाम सुमारे ४००० स्क्वेअर फूट असून बालाजीचा दर्शन मंडप विशाल आहे. देशाचे कृषिमंत्री ना. शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते मंदिराचे उद्घाटन झाले असून परिसरात निवासाचीही व्यवस्था आहे. मंदिरासाठी सुमारे १४ कोटी रुपये खर्च आल्याचे सांगितले जाते.

श्रीक्षेत्र नारायणपूरचे मंदिर दत्ताचे हे जागृत देवस्थान. पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेले हे गाव संत चांगदेवाचे गाव म्हणूनही ओळखले जाते. दत्तमंदिराबरोबरच नारायणेश्वराचे पांडवकालीन जुने देऊळ, त्यांचे बांधकाम, शेजारचा प्राचीन औदुंबर वृक्ष, हेमाडपंथी बांधकाम तसेच भोवतालचा पुरंदरचा निसर्गप्रेमींना व अभ्यासूंना आकर्षित करतो. (मंदिरातील महाराजांच्या पुढाकाराने चाललेले व्यसनमुक्तीचे कार्यही लक्षवेधी.)



नारायणपूर समोरचा सूर्य पर्वत

कऱ्हा नदी व नदीकाठचे संगमेश्वर मंदिर

संतश्रेष्ठ सोपानदेव, संत चांगदेव, श्रीदत्त महाराज, बाळाजी विश्वनाथ पेशवे, होळकर, पुरंदरे, पानसरे यांच्या कर्तृत्वाने नटलेली आणि आचार्य प्र.के.अत्रेंच्या लेखणीने समृध्द झालेली सासवडची भूमी सुजलाम करण्याचे कार्य ही कऱ्हा नदी करते. सासवड गावी नदीकिनारी भव्य संगमेश्वर मंदिर असून सध्या ते आचार्य अत्रे साहित्य संमेलनाच्या निमित्ताने मोठे सांस्कृतिक केंद्र बनले आहे. येथेच जवळ बाळाजी विश्वनाथ यांची समाधी आहे.

वटेश्वर मंदिर

वीर बाजी पासलकर- (कन्हैया चौकी) यांची समाधी

श्रीमंत बालाजी विश्वनाथ यांची समाधी: मूळचे चिपळूण श्री. बाळाजी भट सन १६९९ ते १७०३ या काळात परगण्याची सरसुभेदारी सांभाळीत होते. त्यानंतर सन १७१३ मध्ये ते पेशवे झाले. प्रचंड पराक्रमी असा हा योध्दा वयाच्या ६० व्या वर्षी २एप्रिल १७२० मध्ये स्वर्गवासी झाला. यांचे सासवड येथील संगमेश्वर मंदिराजवळ स्मारक अवश्य पाहण्यासारखे आहे.

सासवडपासुन साधारण १० किमीवर पेशव्यांच्या तोफाखाण्याचे सरदार भीमराव पानसे यांच सोनोरी हे गाव आहे.





## <u>आबासाहेब पुरंदरे वाडा, उंच तटबंदी</u>

हा वाडा १७१० मध्ये बांधला. वाड्याच्या उंच भिंती आता शिल्लक आहेत. मुख्य दरवाजा हा लाकडाचा असुन त्यावर लोखंडी खिळे आहेत.










## भैरवनाथ मंदिर









## सोनेरी जवळचा पानसे यांचा मल्हारगड

पेशव्यांचे पराक्रमी सेनापती सरदार पानसेंचा सोनेरी गावातील हा गढीवजा राजवाडा थेट पुण्यातील शनिवार वाड्यासारखा दिसतो. संपूर्ण काळ्या दगडाचे बांधकाम, आतमध्ये लक्ष्मीनारायणाचे भव्य मंदिर आहे. तसेच इतरही मंदिरे पाहण्यासारखी आहेत. तटबंदीवरुन सुंदर परिसर न्याहाळता येतो.



चांगवटेश्वर मंदिर १ कि.मी.





दिवे घाट : पंढरपूरच्या वारीतील पुण्याची सरहद्द ओलांडताना हा दिवेघाट भेटीला येतो. या घाटात वारकऱ्यांची श्रमपरीक्षा होते.अत्यंत अवघड वळणाचा हा दिवे घाट निसर्गाच्या वरदानाने मात्र अतिशय समृध्द आहे. याच्याच परिसरात चिंकारा हरिणासारखे वन्यप्राणी तसेच आशिया खंडातील दुर्मिळ फुलपाखरे पाहायला मिळतात.

संत सोपानकाकाची समाधी

क्रांतीवीर उमाजी नाईक : ब्रिटिशांविरुध्द लढा पुकारणारे आद्य क्रांतीकारक.

सन १८२६ पासून रामोशी समाजातील शूरविरांना हाताशी धरुन नरवीर उमाजी नाईकांनी ब्रिटीशांना सळो की पळो करुन सोडले. त्याचबरोबर राज्यातील इतरही भागात क्रांतीची ज्वाला प्रज्वलीत केली. पुरंदरच्या भूमीतील या नरवीराला पुण्यातील खडकमाळ येथे ब्रिटीशांनी १८३२ मध्ये आशी दिली. त्यांच्या जन्मगावाजवळ (भिवंडी येथे) स्मारक उभारण्यात आले आहे.

## कानिफनाथ डोंगर :

पुण्याहुन सासवडला जाताना दिवेघाटाने जायच हे सर्वानाच माहित आहे पण जरा वेगळ्या रस्त्याने जाऊन बघा. बापदेव घाटातुन जा. सासवडमध्ये एक चौक आहे. त्यातील एक रस्ता नारायणपूरला जातो. एक जेजुरीला जातो आणि एक बापदेव घाटाकडे येतो. हाच बापदेव घाट पुण्याला कोंढव्याला (लुल्लानगर) निघतो. बापदेव घाटाच्या रस्त्यावरून निघाले की जवळपास १०-१२ कि.मी. वर कानिफनाथाकडे फाटा फुटतो. एक मोठी कमान असल्यामुळे हा फाटा चुकण्याची शक्यता नाही. समोरच आपल्याला सफेद मंदिराचा कळस दिसेल. तेच नागपंथातील गुरु कानिफनाथाचे मंदिर.मंदिर अतिशय सुंदर आहे. कानिफनाथाच्या मंदिरासाठी अजून काही पायऱ्या चढून वर यावे लागते. मंदिराच वेगळेपण म्हणजे एक छोटी गुहा आहे, त्यात सरपटत आत शिरावे लागते. त्यातुन ऑणव हॉऊन आत गेल्यावरच कानिफनाथाचे दर्शन होते. बाहेर पडतानाही देवाला पाय दाखवायचे नाही. कितीही मोठा माणुस असेल पन मनात जर श्रध्दा असेल तर आत जाउ शकतो. तिथे

असा फलक पण लावला आहे की 'असेल श्रध्दा ज्याच्या उरी त्याला दिसे कानिफनाथ मुरारी.' तिथला पुजारी आत शिरण्याची युक्ती सांगतो. आत शिरण्यापूर्वी शर्ट, बनियन, बेल्ट काढून आत शिरावे लागते. आतमध्ये शिरल्यावर अंधाराला डोळे सरावतात आणि थोड्याच वेळात समाधी नीट दिसू लागते. मशिदीसारखे त्यावर एक कापड पसरलेले दिसले. बाहेर येताना जसे आत शिरलो तसेच बाहेर पडता येते. मंदिरातील गाभारा मोठा आहे. मंदिराच्या सभामंडपात गोरसःनाथ, जालिंदरनाथ, मच्छिंद्रनाथ यांच्या समाधी आहेत. तिथे अन्नछत्र चालु असते. पण मिळणारा भात आमटी अगदी अप्रतिम असतो.

पुरंदर तालुक्याजवळील पर्यटन स्थळे व अंतर :

भोर सासवड ४५ कि.मी

कापूरव्होळ सासवड २५ कि.मी

सासवड हडपसर २२ कि.मी.

हिडन ओअसिस कृषी पर्यटन - केंद्रसंपर्क - श्री. युनूस सिप चांदलर

गरांडे धरण,मु.पो. गराडे,

ता.-पुरंदर, जि. पुणे.

बापुज कृषी पर्यटन केंद्र - केंद्रसंपर्क - श्री.विजयराव झोळ

पिंपळोली, तालुका मुळशी पोस्ट रिहे. (चांदणी चाकातुन – ३० कि.मी., पिंरगुटपासुन – १४ कि.मी.)

# <u>भोर तालुका</u>

भोर हे एक राजाची सत्ता असलेले एक जुन्या काळचे संस्थान होते. आजही आपणास राजवाडा तसेच संस्थानाच्या अस्तित्वाच्या खाणाखुणा पाहावयास मिळतात. भोर तालुक्यात एकूण ३० ते ४० गावे असून, सर्व गावाना चहूबाजूंच्या डोंगरांमुळे निसर्गसौन्दर्य लाभले आहे. भोरमध्ये काही चांगल्या शिक्षणसंस्था आहेत. भोर तालुकयात धुमाळ-देशमुख हे घराणे इतिहासापासून प्रसिद्ध आहे, शिवकालातिल आपल्या पूर्वजांची तलवार, देशमुखी वतनाचा शिक्का, नाणी, कट्यार व महत्त्वाची बरीच ऐतिहासिक कागदपत्र अजुनही त्यांच्या घराण्याच्या संग्रहात आहेत..

भोरच्या जवळपास भाटघर आणि नीरा देवघर ही दोन धरणे आहेत.भोर धरणाच्या परिसरात पावसाळ्यात बघ्यांची खूप गर्दी असते. पावसाळ्यातील निसर्ग पर्यटकांचे लक्ष वेधून घेतो. भोर जवळच राजगड, तोरणा हे किल्ले व रायरेश्वर पठार आहे. पावसाळ्यात येथे गिरिभ्रमणासाठी तरुणांची खूप गर्दी असते.भोर तालुका शेतीप्रधान असून येथील मालाला बाजारात भरपूर मागणी आहे. भोर परिसरात अलीकडील काळात लहान मोठ्या अनेक उद्योगधंद्याचे केंद्रीकरण झाले असून येथील रंगाचा व रेक्झीनचा (भोर इंडस्ट्रीज) कारखाना प्रसिद्ध आहे.

**भाटघर** : हे भोर तालुक्यात असून नीरेची उपनदी वेळवंडीवर बांधलेले 'लॉईड धरण' येथे आहे. या धरणाच्या जलाशयास आता 'येसाजी कंक जलाशय' असे नाव देण्यात आले आहे. पुण्यापासून ४० कि.मी. अंतरावर असलेले हे स्थळ आता पर्यटककेंद्र म्हणून विकसित होत आहे.

## <u>भोरचा राजवाडा</u>

पुण्यापासून दक्षिणेला २० कि.मी. अंतरावर भोर संस्थानचं वैभव अजूनही वास्तुरूपानं सांभाळलेलं आहे. संस्थानिक वैभवाची साक्ष देणारा, कलाकुसरीने परिपूर्ण असा वास्तुकलेचा उत्तम नमुना तसेच जनमानसातही आदराचे स्थान असलेला भोरचा राजवाडा हा महाराष्ट्राचा अनमोल वारसा आहे. **राजवैभव जरी सरलं तरी त्या काळाच्या ऐश्वर्याची व**

उच्च अभिरूचीची कल्पना वास्तूच्या अंतर्बाह्य रूपातून प्रतीत होते. ब्रिटीश सरकारच्या संस्थान खालसा धोरणामध्ये, हे एकमेव असे संस्थान होते ज्याला ब्रिटीश सरकार खालसा करू शकले नाहीत.दरवर्षी राजवाडयात रामनवमीचा सण मोठया दिमाखात साजरा केला जातो. आजही रामनवमीला गावभोजन असते.  २०१० मध्ये राजवाड्याच्या वास्तूला १४१ वर्षे पूर्ण होत आहेत. राजवाड्याची पुनर्बांधणी ही इंग्रजांच्या काळात आल्यामुळे साहजिकच पेशवेकालीन शैली व व्हिक्टोरियन शैली यांची रसमिसळ वास्तुकलेमधून दिसून येते. चार मजली राजवाड्याचे क्षेत्रफळ सुमारे ४४ हजार चौरस फूट आहे.





अप्रतिम लाकूडकाम, दगडकाम, वीटकाम यांचा मिलाफ वाड्याच्या वास्तुशिल्पामधून दिसून येतो. तीन चौकी प्रशस्त वाड्याची जमिनीवरील व्याप्ती इंग्रजी 'एल' अक्षराप्रमाणे आहे. पूर्वाभिमुख वाड्याचे प्रथमदर्शनी रूप मोठे वेधक आहे. तिसरे पंतसचिव श्री. चिमाजी नारायण यांच्या कारकीर्दीत १७४० मध्ये राजवाडा बांधला. पंतसचिव घराण्याच्या नवीन पिढीनेही त्याचे महत्त्व जाणून हा राजवाडा उमेदीनं सांभाळला आहे.



## <u>आंबवडे गाव एक भटकंती</u>




लोकसत्ता साभार

पुणे जिल्हय़ातील भोर तालुक्यातील आंबवडे गाव पावसात किंवा केव्हाही जाण्यासाठी खुप छान आहे. रायरेश्वराच्या पठारावर जाताना मध्ये आंबवडे गाव लागते.

हिरडस मावळातील हे एक छोटेसे गाव. डोंगरदरीत, हिरवाईच्या कुशीत पहुडलेले. गावाला खेटूनच एक खळाळता ओढा वाहतो. या ओढय़ाच्या काठावर दाट झाडीत एक प्राचीन शिवालय दडले आहे आणि या साऱ्यांच्या सहवासात कधीही गेलो, तरी केवळ नीरव शांतता आणि भरून राहिलेली प्रसन्नताच अनुभवायला मिळते!

भोरपासून १० किलोमीटरवर हे आंबवडे गाव. इथपर्यंत येण्यासाठी भोरवरून एसटीची सोय आहे. डोंगरदरीतली ही वाट हिरवाईची सोबत करतच निघते. खळखळत्या ओढय़ाच्या पलीकडच्या तीरावर घट्ट झाडी आणि या झाडीमध्ये नागेश्वराचे प्राचीन शिवालय लपलेले आहे.

आंबवडे हे भोरचे संस्थानिक पंतसचिव यांचे गाव. या संस्थानचे संस्थापक शंकराजी नारायण सचिव यांची समाधी गावातच आहे. ही समाधी आणि नागेश्वर मंदिर या संस्थानकाळच्याच आठवणी. ही दोन्ही स्थळे ओढय़ाच्या पलीकडे. या पैलतीरी जाण्यासाठीच कधी संस्थानकाळी हा झुलता पूल इथे आकारास आला. आंबवडय़ात शिरणाऱ्या प्रत्येक पावलांचा काही काळ इथे या झुलत्या पुलावर रेंगाळतो.

आंबवडे गावाशेजारून वाहणारा हा ओढा म्हणजे छोटीशी नदीच आहे. चांगली रुंदी आणि खोली. म्हणून मग हे पात्र ओलांडण्यासाठी १९३६ साली या झुलत्या पुलाची उभारणी केली. याची रुंदी ४ फूट तर लांबी दीडशे फुटांच्या घरात आहे. पुलाच्या दोन्ही अंगास रेखीव कमानी आहेत. त्यावर पुलाच्या बांधकामाचे तपशील सांगणारे लेख आहेत. माथ्यावर 'ओम' हे शुभचिन्ह कोरलेले आहे.

हा झुलता पूल भोर संस्थानचे राजे श्रीमंत रघुनाथराव शंकरराव पंडित पंतसचिव यांनी आपली आई श्रीमंत जिजिसाहेब पंतसचिव यांच्या स्मरणार्थ बांधला. यासाठी त्या वेळी १० हजार रुपये खर्च आला. १५ नोव्हेंबर १९३७ रोजी मिरजेचे राजे सर गंगाधरराव ऊर्फ बाळासाहेब पटवर्धन यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. या साऱ्या तपशिलाची नोंद या पुलाच्या दोन्ही बाजूकडील स्वागत कमानींवर घेतलेली आहे.

झुलत्या पुलाचा तपशील वाचला, की त्याच्यावरचे हे चालणे, हलणे आणखी मजेशीर वाटू लागते. ही गंमत अनुभवायची आणि पलीकडच्या तीरावर दाखल व्हायचे. अगदी सुरुवातीला आपण समाधी परिसरात येतो. एका मोठय़ा इमारतीत मधोमध भोरच्या राजाची, शंकराजी नारायण सचिव यांची समाधी आहे. छत्रपती संभाजीमहाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्याच्या सीमांचे रक्षण करण्यात या पंतसचिवांचा मोठा वाटा होता. या समाधीशेजारीच संस्थानच्या राणीसाहेब जिजिसाहेब यांचा अर्धपुतळा आहे. ज्येष्ठ शिल्पकार विनायक करमरकर यांनी घडवलेला हा पुतळा पाहण्यासारखा आहे. या अशा स्मारकांच्या केवळ दर्शनातूनही इतिहासाच्या त्या पर्वात बुडायला होते.

या स्मारकाशेजारूनच एक वाट नागेश्वराकडे उतरते. हे मंदिर थोडेसे खोलगट भागात आहे. जुन्या मोठाल्या वृक्षांच्या गर्दीतूनच एक पायरी मार्ग वळणे घेत या नागेश्वरासमोर

दाखल होतो. मोठा फरसबंदी प्राकार, भोवतीने तट, ओवऱ्या, पाण्याची कुंडे, पाण्याचे वाहते प्रवाह आणि या साऱ्यांच्या मधोमध उभे असलेले नागेश्वर मंदिर! एखादा नायक असावा असे.

दूरवरूनच ही रचना लक्ष वेधून घेते. पश्चिमाभिमुख असलेले हे मंदिर एका उंच जोत्यावर उभे आहे. मंदिराच्या दर्शनी भागावरच एक लेख लावलेला आहे. ज्यामध्ये नागसंस्कृतीतील लोकांचा हा देव असून, या मंदिराचा वेळोवेळी जीर्णोद्धार केल्याचा अल्लेख आहे.मुखमंडप, सभामंडप आणि गर्भगृह अशी मंदिराची रचना आहे. प्रवेशद्वाराभोवती नाजूक शिल्पकाम केलेले आहे. आतील स्तंभही शिल्पकलेने नटलेले आहेत. बाहय़भिंतीवर उमलती कमळे, झाडांच्या पानांचे नक्षीपट उठवण्यात आले आहेत. हत्तीवर अंबारीत स्वार झालेली कुणी राजमान्य व्यक्ती, शरभ, मोर आदी शिल्पांची रचना आहे. शिखरही असेच कोरीव. पश्चिमाभिमुख असलेल्या या मंदिराच्या मागील पूर्व अंगासही एक कोरीव दरवाजा असल्याचा भास होतो. पण जवळ गेल्यावर तो त्या स्थापत्याचाच एक भाग असल्याचे समजल्यावर उडायला होते.

आंबवडय़ाला वळसा घालत निघालेला तो ओढा इथे नागेश्वराजवळ एखाद्या धबधब्याप्रमाणे उडय़ा घेत धावत असतो. जवळ गेल्यावर त्याच्या तुषारांमध्ये भिजायला होते. पावसाळय़ातील त्याचे हे विराट रूप पाहण्यासारखे असते.ओढय़ाचा हा खळखळाट अनुभवत मंदिर प्राकारात यावे तो ती नीरव शांतता पुन्हा स्पर्श करू लागते. मंदिराभोवती पाण्याच्या कुंडांची रचना आहे. ज्यातून पाण्याचे अनेक प्रवाह मंदिराभोवती खेळते आहेत. पाण्याच्या या प्रवाहांनाही एक नाद असतो.

भोवतीची गर्द झाडी, त्यातील पक्ष्यांचा किलबिलाट, पाण्याचे खेळते प्रवाह आणि या साऱ्यांच्या मधोमध उभा नागेश्वराचा तो प्राकार! हे सारे पाहता-अनुभवताना चित्त एकाग्र होऊ लागते. आपल्या या समाधीला, या शांत अनुभूतीला गाभाऱ्यातील तो घंटानाद खोलवरची कंपने पुरवत असतो. मध्येच पावसाची एखादी सर येते. तिच्या पाठी दरीत कोंडलेले ढगही उतरतात आणि सारेच चित्र धूसर होते. त्या धूसरपणात दिसणाऱ्या आकृतीलाही एक गूढता असते.

# साहस प्लस रिसॉर्ट ,भोर













## <u>वेल्हे तालुका</u>




पर्यटकांना वेल्हे तालुक्यातील डोंगरकपारीतून वाहणारे झरे, हिरव्यागार वनराजीतून फेसाळत कोसळणारे धबधबे, हिरवी वस्त्रे परिधान केलेली भातशेतीची खाचरे, रिमझिम पावसातील धुक्याची दुलई आणि दुसरीकडे ताठ मानेने स्वराज्याच्या इतिहासाची भक्कम साक्ष देणारे राजगड, तोरणा हे किल्ले... असा ऐतिहासिक वारसा दिमाखात मिरवणारा हा परिसर पर्यटकांसाठी एक पर्वणीच आहे. महाबळेश्वर, लोणावळा, पाचगणी या ठिकाणांचा तोचतोचपणा, गर्दी- गोंगाट, प्रदूषण, वाढती महागाई याने त्रस्त झालेल्या पर्यटकांना येथे त्याहीपेक्षा सरस असे सौंदर्य शांत, गर्दी-गोंगाटापासून दूर व प्रदूषणमुक्त, कमी खर्चात व पुणे शहरापासून जवळच्या अंतरावर सहजपणे पाहता येईल. वेल्हे गावाजवळ हिरव्यागार वनराजीत नटलेला व समुद्रसपाटीपासून १४०३ मीटर उंचीवरचा तोरणा किल्ला आपल्या डोळयांचे पारणे फेडतो. या गडावरून हिरव्यागार डोंगर रांगा, दऱ्या, पांढऱ्याशुभ्र पाण्याचे धबधबे पाहताना मन ताजेतवाने होते. या किल्ल्यावरून अनेक किल्ले व पठारांचे दर्शन होते. राजगड- शिवछत्रपतींच्या स्वराज्याची राजधानी असलेला व निसर्गाच्या कुशीत वसलेला ट्रेकिंगसाठी आव्हानात्मक असा पर्यटकांना भुरळ घालणारा किल्ला आहे.

सुवेळा, संजीवनी व पद्मावती अशा तीन माच्यांमध्ये किल्ल्याचा भलामोठा विस्तार आहे. सुवेळा व संजीवनी माचीवरून भाटघर धरणाच्या बॅकवॉटरचे (पाणीसाठ्याचे)

विहंगम दृश्य पाहायला मिळते, तसेच या गडावर जिवंत पाण्याची २५ लहान-मोठी तळी (टाके) व शिवाजी महाराजांच्या पत्नी सईबाई यांची समाधी आहे.

**गुंजवणी धरण-** वेल्हे गावापासून जवळच असलेले गुंजवणी धरण आहे. धरणाच्या रुंद भिंतीवरून जलाशयाचे व आजूबाजूचे सौंदर्य पाहून मन प्रसन्न होते. पानशेत धरण- जलाशयात बोट क्लब सुविधा असून, हिरव्यागार निसर्गाच्या कुशीतील हा प्रचंड जलाशय पाहताना पर्यटकांना अत्यानंद होईल. त्याचबरोबर वर्षाविहारातील नौकाविहाराचा आनंदही घेता येईल.

केळदचा मढेघाट म्हणजे मिनी महाबळेश्वर-वेल्हेपासून १६ किलोमीटर अंतरावर कोकण कड्यावरील शेवटचे गाव म्हणजे केळद निसर्गाच्या गालिच्यावर वसलेले हे दुर्गम गाव. केळद म्हणजे मिनी महाबळेश्वर आहे. अंगाला झोंबणारा गार वारा धुक्याच्या दुलईतून चालताना अवकाशात गेल्याचा होणारा भास आणि धुक्यातील दवबिंदू अंगावर साचल्यानंतर हिवाळयाची आठवण होते. या ठिकाणचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आपण नेहमी पावसाच्या जलधारा वरून खाली येताना पाहतो, पण येथे कड्यावर खालून वर येणाऱ्या पावसाच्या जलधारांचे नयनरम्य विलोभनीय सौंदर्य पर्यटकांना भुरळ घालील.

कोदवडी डोंगरमाथा येथून भाटघर धरणातील पाण्याच्या प्रचंड जलाशयाचे विलक्षण दृश्य पाहता येते, तसेच गुंजवणे खोऱ्यातील निसर्गरम्य दऱ्याखोऱ्याचा प्रदेश पाहता येतो.

काय पाहाल – तोरणा किल्ला राजगड किल्ला गुंजवणी धरण पानशेत धरण केळदचा मढेघाट म्हणजे मिनी महाबळेश्वर कोदवडीचा डोंगरमाथ्यावरूनचे दृश्य

**अमृतराई कृषि पर्यटन -** केंद्रसंपर्क-श्री. अपूर्व अनंत जोग

गट नं. ३१०, मौजे केतकावणे,

ता. वेल्हा, जि. पुणे.

**तोरणा टेन्टस कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क - श्री. विलास पाटील

मु.पो. लाशिरगाव(पाटीलसर),

ता. वेल्हा,जि.पुणे.

# मुळशी तालुका

पुणे शहराला सर्वांत जवळचा असणारा व निसर्गसौंदर्याच्या बाबतीत पुणे जिल्ह्यातील काश्मीर अशी वेगळी ओळख असलेला मुळशी हा तालुका होय.  इंद्रायणी, आंबेमोहोर यांसारख्या भाताचा आगार व हापूस, रायवळ यांसारख्या आंब्याचा उत्पादक तालुका म्हणूनही मुळशीची ओळख मुंबई व पुणे शहराला आहे.भव्य गृहप्रकल्पाबरोबरच चिन्मय विभूती, हाडशी यांसारखी आध्यात्मिक केंद्रे, शेती पर्यटन केंद्रे तसेच मल्हारमाचीसारखा महाराष्ट्र पर्यटन मंडळाच्या सहकार्याने जलसृष्टी प्रकल्प या ठिकाणी उभा राहिला आहे.



तालुक्याच्या पश्चिम टोकाला आपण गेलो की, एका उंच ठिकाणी आपण पोहोचल्याचा अनुभव येतो. पावसाळा व हिवाळयात धुक्याच्या दुलईत लपून बसलेला तळकोकण आपणाला उन्हाळयामध्ये याच ठिकाणावरून डोळे भरून पाहता येतो. पुणे-महाड महामार्गावरून जात असताना ताम्हिणी घाट परिसरात आपल्याला निसर्गाची विविध रूपं आपल्याला अनुभवायला मिळतात. . याच परिसरात असणारा पळसे येथील धबधबा पाहण्यासाठी पावसाळयाच्या दिवसात पर्यटकांची रीघ लागते.  मुळशीचे निसर्गसौंदर्य, पर्यावरण व तेथील जीवसृष्टी अबाधित राखण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून शासनाने मागील वर्षीच ताम्हिणीचा हजारो हेक्टरचा परिसर आता ग्रीन झोन म्हणून घोषित करण्यात आला आहे

पांडुरंग महादेव बापट ऊर्फ सेनापती बापट (नोव्हेंबर १२, इ.स. १८८० - नोव्हेंबर २८,इ.स. १९६७) हे भारतीय क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक होते. इ.स. १९२१ ते इ.स. १९२४ या कालखंडात पुणे जिल्हयातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकर्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालवले या आंदोलनादरम्यान बापटांना सेनापती म्हणून ओळखले जाऊ लागले. या आंदोलनात त्यांना तीनदा कारागृहावासाची शिक्षा झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. . संस्थानांतल्या प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या

आंदोलनांत भाग घेऊन त्यांनी संस्थानच्या प्रवेशबंद्या मोडल्या त्याबदल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढ विरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इत्यादी आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला  पुण्यातील १५ ऑगस्ट, इ.स. १९४७ साली ध्वजारोहण सेनापती बापटांच्या हस्ते करण्यात आले. पुण्यातील एका सार्वजनिक रस्त्याला त्यांचे नाव देण्यात आले आहे.

मुळशी धरण हे पुणे जिल्ह्यातील मुळा नदीवरील धरण आहे. या धरणातील पाणी पुणे जिल्ह्यात सिंचनासाठी वापरले जाते. या व्यतिरिक्त येथे अडवलेले पाणीटाटा पॉवर कंपनीच्या भिरा जलविद्युत निर्मिती केंद्रातील सहा २५ मेगावॉट पेल्टन टर्बाइनचालवण्यासाठीही होतो. येथे निर्माण झालेली वीज मुंबई शहरात वापरण्यात येते.मुळशी धरणग्रस्तांच्या समस्येवर पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रमुख राजेंद्र व्होरा यांनी 'वल्ड्स फस्ट ॲन्टी डॅम मूव्हमेंट' हे पुस्तक लिहिलेले आहे.

**निसर्गाचं भरभरून दान लाभलेला मुळशी तालुका**

**पिंपरी तलाव - ताम्हिणी घाट**



ताम्हिणी घाटात कितीही वेळा गेले तर मनच भरत नाही.ताम्हिणी घाटात  कुठल्याही ऋतूमध्ये जा त्याची सुंदरता जराही कमी होत नाही. पण हो पावसाळयात ताम्हीणीचे सौंदर्य जरा नाही फारच जास्त खुलते.ताम्हिणी घाट परिसरात अजून एक सुंदर ठिकाण आहे - पिंपरी व्ह्याली आणि पिंपरी तलाव .  जरा कमी गर्दीचे आणि सुंदर असे ठिकाण. लहान मोठे  धबधबे, भरपूर झाडी , धुक्यात हरवलेले डोंगर अन रस्ते . आणि गडबड  गोंधळ नसलेला अतिशय सुंदर शांत परिसर.



ताम्हिणी गाव ओलांडले की ३-४ किमी वर उजव्या हाताला लोणावळा फाटा लागतो. फाट्यावरून उजवीकडे वळला की धुक्यात हरवत चाललेला एक लहानसा डांबरी रस्ता तुमची स्वागत करतो. नंतर हाच रस्ता धुक्याबरोबर झाडीतही वळणे घेत हरवत जातो. हा रस्ता किती सुंदर आहे म्हणून सांगू , स्वर्गाचे प्रवेशद्वार म्हटल्यावर त्याने सुंदर असायलाच हवे, नाही का ? इथून निघून जरा पुढे गेला की लागतो एक सुंदर तलाव. लहान आहे तलाव त्यामुळे लगेच भरतो आणि त्याच्या भिंतीवरून पाणी खाली वाहायला लागते. फार सुंदर नजरा असतो. इथे भुट्टा,भेळ,भजी असलं  काहीही मिळत नाही. एकदम स्वच्छ आणि सुंदर परिसर.

रस्ते: पुणे-पौड-मुळशी-ताम्हिणी-पिंपरी

ह्याच रस्त्याने पुढे लोणावळयाला जाता येते (पिंपरी - भांबर्डे - कोराईगड -लोणावळा )

आसपासचा परिसर: ताम्हिणी(६ किमी), कैलासगड, घनगड, तैलबैला



ऋतू कोणताही असो ताम्हिणी घाटात रिफ्रेश होण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांची संख्या खूप मोठी आहे. दिवसेंदिवस येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत खूप मोठी वाढ होत आहे. त्यामुळे येथील वनसंपदा व वन्यजीवांना धोका निर्माण होऊ लागला आहे. म्हणूनच ताम्हिणीच्या भागातील दुर्मिळ वनसंपदा व वन्यजीवांना संरक्षण देण्याची गरज असल्याने वनविभागाने ताम्हिणी घाटाला 'अभयारण्याचा' दर्जा देण्याचे ठरवले आहे.

## ॥ मुलखेडचा खंडोबा ॥

॥ ॐ मार्तंड भैरवाय नम:॥

मुलखेड, मुळशी तालुक्यातील मुळा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले एक सुंदर खेडे. सगळीकडे हिरवीगार शेती, पाठीमागे आणि डाव्या बाजूला डोंगररांग डोंगरातील घनदाट झाडी, आणि उजव्या बाजूने गावाला वळसा घालून बारामहीने वाहणारी मुळा नदी नदीकाठी शंकराची दोन सुंदर प्राचीन मंदिरे , गावाच्या मध्यभागी विठ्ठल मंदिर आणि थोडे खालच्या बाजूला ग्रामदैवत भैरवनाथ तेही मंदिर पुरातन,आणि गावाचा पाठीराखा खंडोबा वरती डोंगरावर बसून गावाचे रक्षण करतोय. साधारणता बाराशे ते पंधराशे फुट उंचीचा खंडोबाचा डोंगर आहे. दक्षिणेच्या बाजूने सरळ चढण आहे तो भाग सर्व खडकाचा असल्यामुळे थोडा वृक्ष विरहित आहे परंतु डोंगराचा उत्तर आणि पश्चिम भाग हे घनदाट झाडीने व्यापलेले आहेत.

खंडोबाचे मंदिर पुरातन आहे ते कोणत्या काळात बांधले गेले आहे हे कोणालाच माहित नाही. परंतु मंदिर खूप सुंदर आहे. आतमध्ये खंडोबा, म्हाळसाई मार्तंड भैरव आणि इतरही काही सुंदर मूर्ती आहेत व बाहेर कासव आणि एक पडकी दीपमाळ आहे. वरती चढून गेल्यावर थोडीशी दमछाक होती. परंतु एकदा तेथे पोहचले कि मंदिर आणि आजूबाजूचा परिसर पाहून सर्व शीण कुठच्या कुठे जातो. शिवाय थंड वाऱ्याने तहानही हरपल्या सारखी होते.

मुलखेड मध्ये खंडोबा, भैरवनाथ आणि शंकर हि एकाच देवाची तीन म्हणजे शंकराच्या अवताराची तिन्ही मंदिरे आहेत तीनही मंदिरे पुरातन आहे परंतु त्यांचा इतिहास कोणालाच माहिती नाही.

खंडोबा देवाचे उत्सव चैत्र पोर्णिमा आणि नवरात्रीमध्ये साजरे होतात. आता डोंगरावर जाण्यासाठी रघुनाथ तापकीर यांनी आणि काही भाविकांनी रस्ताही बनविला आहे. चारचाकी दुचाकी मंदिरापर्यंत नेता येते. मुलखेडचा खंडोबा हे जागृत देवस्थान आहे. त्याची जो मनोभावे सेवा करतो त्याच्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण होतात. नुकताच मंदिराची दुरुस्ती करण्यात आली आहे. समोर एक पत्र्याचे शेड बनविले आहे. रंगरंगोटी करून नवीन

कळस बसविले आहेत. कळस संदर्भात एक घटना नुकतीच घडली आहे. कळस बसविल्या नंतर काही दिवसातच ते चोरीला गेले. राक्षसी वृत्तीच्या चोरट्यांनी कळस चोरले खरे परंतु खंडेरायाने त्यांना काहीतरी अद्दल घडविली आणि त्यांनी काही दिवसातच चोरलेले कळस पुन्हा मंदिराजवळ आणून टाकले. वरील घटना हि जेजुरी येथे काही वर्ष्यापुर्वी घडलेल्या घटनेची आठवण करून देते. मुलखेड गावातील वयोवृद्ध सांगतात कि आपल्या गावाचा खंडोबा हा जेजुरीचाच आहे.

संपूर्ण महाराष्ट्रचे कुलदैवत खंडोबा देशातही इतर खूप ठिकाणी आहे त्याची हि माहिती

खंडोबाची खालील स्थाने आहेत.

अणदूर (नळदुर्ग) (उस्मानाबाद जिल्हा)

आदी मैलार (बीदर जिल्हा) (गुलबर्ग्याजवळ)

काळज (ता. फलटण)(सातारा जिल्हा)

जेजुरी (पुणे जिल्हा) (खंडोबा देवाचे मुख्य पीठ)

देवरगुड्डा (राणीबेन्नूर)

निमगाव दावडी (पुणे जिल्हा)

पाली (सातारा जिल्हा)

पिंपळगाव निपाणी ता. निफाड जि. नाशिक

मंगसुळी (बेळगाव जिल्हा)

माळेगाव (नांदेड जिल्हा)

मैलार लिंगप्पा (खानापूर, बेळगाव जिल्हा)

मैलारपूर (यादगीर) (बेळ्ळारी जिल्हा)

शेगुड (अहमदनगर जिल्हा)

सातारे (औरंगाबाद जिल्हा)

**खारावड्याचा म्हसोबा :-**

मुठा खिंडीपलीकडे मुठागाव, नंतर खारावडे येथील खारावड्याचा म्हसोबा म्हणून छोटेसे देवालय आहे; हे देवस्थान प्रसिद्ध आहे. १०१ तोळयांचा सुवर्णकळस असलेले मुळशीतील हे एकमेव मंदिर अशी ख्याती खारावडे देवस्थानास प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र शासनाने म्हसोबा देवस्थानाला तिर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे.

**पिंरगुट:-** हे मुळशी तालुक्यातील सर्वात मोठे गांव आहे व तालुक्यातील कांदा, बटाटा इत्यादी फ़ळत्पोदनाची सर्वात मोठी बाजारपेठ आहे.. तसेच सदर गावामधून कोलाड-मुळशी-पुणे मार्ग जात असलेने मोठ्या प्रमाणात वाह्तुक होत असते.

पिरंगुट गावचे ग्रामदैवत म्हणजे भैरवनाथ. दरवर्षी चैत्र शुक्ल प्रतिपदेला म्हणजेच गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर गावात भैरवनाथाचा उत्सव धार्मिक व पारंपारिक पद्धतीने साजरा केला जातो . तसेच अवघ्या महाराष्ट्राचे दैवत असलेल्या व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळातील वास्तुकलेचा अप्रतिम नजराणा म्हणजे तुळजाभवानीचे मंदिर.गावामध्ये पेशवेकालीन गणेश मंदिर आहे. यालाच प्रती चिंतामणी असेही संबोधतात. हे मंदिर मोरया गोसावी देवस्थान , चिंचवड यांच्या अंतर्गत येते.तसेच पिरंगुट गावात प्रवेश करताना घाटामध्ये म्हसोबाचे मंदिर आहे. अशा या धार्मिक भूमीला संत नागा महाराज्यांची जन्मभूमी म्हणूनही ओळखले जाते. १३ व्या शतकातील संत ज्ञानेश्वर महाराज यांचे समकालीन संत म्हणून नागा महाराज यांनी काम केले. तसेच मुकाई वाडी मुकाई देवी व विन्जाई देवी प्रसिद्ध आहे.

पिंरगुट गावाच्या परिसरामध्ये कोका-कोला सारखी जागतिक दजाची कंपनी आहे तसेच इतरही मोठया कंपनी आहेत.

**मळवली : मराठी स्त्रीचा सुडौल वेष अमर करणारा चित्रकार – राजा रविवर्मा**

मळवली गावामध्ये स्थानकाच्या विरुध्द बाजुला राजा रविवर्मा ह्या एका परप्रांतीय चित्रकाराने आपला कलाविलास उभा केला होता हे आज बर्याचजणांना महित ही नाही.याच मळवलीच्या मुद्रणालयात जर्मन कारागिरांनी छापलेली सुबक चित्रे आता इतिहासजमा आहेत. भारताच्या अनेक सुखवस्तु घरात पुर्वी दिसणारी राजा रविवर्म्याची चित्रे आता

आधुनिक सजावटीत हळुहळु नाहीशी होऊ लागली आहेत.याच राजा रविवर्म्याने मराठी स्त्रीच्या नऊवारी साडीचे सौष्ठव हेरले व देवादिकांना ती घालुन त्यांनी सर्वांना महाराष्ट्रीय करुन टाकले.राजा रविवर्मा( २९ एप्रिल १८४८- २ आक्टोबर १९०६) यांच्या म्रुत्युनंतर मळवलीचे मुद्रणालयही अनेक वर्षे बंद होते. आता देखिल त्याची सध्य स्थिती तिथे जाऊनच बघावी लागेल.

## बाहुल्यांच्या विश्वात : बाहुलीनाट्यकार सुषमा दातार

मुळशीतील एक अनोख्या कलाकाराला आपण भेटणार आहोत. "प्रौढत्वी निज शैशवास जपणे" ह्या आपल्या बाण्याशी प्रामाणिक राहून गेली दोन दशके लोकरंजनाबरोबरच सामाजिक जागृती, पर्यावरण प्रबोधन व मूल्यांची जाणीव करून देणाऱ्या कठपुतळीकार आणि "संवाद"शिल्पी सुषमा दातार यांच्याशी त्यांच्या कठपुतळी कलेविषयी व हातमोजांच्या कठपुतळयांचे खेळ ह्याविषयी ही माहिती.

**सुषमाताईंच्या संग्रहातील काही स्वनिर्मित बाहुल्या**

शिवणकाम, रंगकाम, कलाकुसरीचे सर्व साहित्य तर ह्यात लागतेच, शिवाय आमच्या या बाहुल्या अनेकदा टाकाऊतून टिकाऊ किंवा कचऱ्यातून कला ह्या धर्तीवर तयार होतात. सुषमाताईंना स्वतःला अशा कामाची विलक्षण आवड असल्यामुळे त्यात बरेच प्रयोग करता आले. तुमच्यातील कलाकारीला इथे भरपूर वाव असतो. बाहुल्यांच्या या खेळासाठी तांत्रिक कौशल्य (नेपथ्य, शिवणकाम, चित्रकला, अभिनयाची माहिती, संवादफेक इ. इ. ) तर लागतेच पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे हजरजबाबीपणा, उत्स्फूर्तता व विनोदबुद्धी! आवाजात बदल - चढ उतार, हात व हाताची बोटे सफाईदारपणे नाचवावी लागतात. त्यांचे हे प्रयोग जास्त करून लहान मुलांसमोर असतात. त्यामुळे त्या त्या वयोगटाची भाषा, त्यांची समज, वातावरण, त्यांच्या आवडी-निवडी इत्यादी अनेक गोष्टी लक्षात घेऊन संवाद तयार करायला लागतात.







बोटांवर नाचणार्या फिंगर पपेट्स (टाकाऊतून टिकाऊ)

असा रंगतो अमुचा खेळ! (लाडूची गोष्ट)






आजी आणि नातवंडे



बाहुल्यांच्या खेळाविषयी त्यांनी मराठीतुनच एक पुस्तक लिहले आहे. त्याचे नाव आहे पपेटची दुनिया. कोणाला मागवायची असल्यास तुम्ही थेट त्यांच्याशी संपर्क साधू शकता. दूरध्वनी क्रमांक : (पुणे) ०२० २५४३२५८०.

ईमेल : sushamadatar@gmail.com

त्यांच्या कार्याविषयी अधिक जाणुन घेण्यासाठी त्यांना प्रत्यशः च भेटायलाच हवे.




त्यांना प्रत्यशः च भेटायलाच हवे.



## चिन्मय विभुती:

कोळवन येथे  चिन्मय मिशनचे ध्यान केंद्र आहे.  चिन्मय मिशन ही इ. १९५३ मध्ये स्थापलेली एक आध्यात्मिक, शैक्षणिक व धार्मिक संस्था आहे. तिचे व्यवस्थापन सेंट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट द्वारे होते. स्वामी चिन्मयानंदांनी केलेल्या कार्याला संघटित स्वरूप देण्यासाठी त्यांच्या शिष्यांनी या मिशनाची स्थापना केली. सध्या भारत भरात व जगात अन्यत्र याची ३०० हून अधिक केंद्रे कार्यरत आहेत. स्वामी तेजोमयानंद हे जागतिक प्रमुख आहेत. चिन्मय जिवन दर्शन वेळ:

शनिवार, रविवार, आणि गुरुवार दुपारी १.३० ते ३.३० असा आहे.

बाजुला दोन मंदिर आहेत.गणेश मंदिर आणि मारुती मंदिर- वेळ- सकाळी ६ ते ८, ९.३० ते १२ आणि दुपारी ४.३० ते  रात्री ८ वाजेपर्यंत. चिन्मय वाणी दुकान सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत

पत्ता : पोस्ट कोळवन, तालुका मुळशी, पुणे, महाराष्ट ४१२१०८, फोन नंबर ०२०-२२९६००१२





**ऋतुपर्ण फार्म ग्रामीण कृषि पर्यटन -** केंद्रसंपर्क-सौ. स्वाती वसंत पवार

मु. पो. भादस , शिळेश्वर.

ता. मुळशी, जि. पुणे.

**बापूज कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क - श्री. विजयराव मल्हारराव झोळ

मु. पिंपळोली,पो. रिहे,

ता.-मुळशी, जि. पुणे.

**सृष्टी कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क - श्री. आनंत पवार

मु. आवारवाडी,ता. मुळशी,जि. पुणे.

**कोंडाजीबाबा कृषी पर्यटन-** केंद्रसंपर्क - श्री. निवृत्ती जोरी

पो. माले,ता. मुळशी,जि. पुणे.

**विमल सरोवर कृषी पर्यटन -** केंद्रसंपर्क - श्री. प्रकाश शहा

मु.साई खुर्द,

ता. मुळशी, जि.पुणे.

**ऋतुपर्ण फार्म ग्रामीण कृषि पर्यटन**- केंद्रसंपर्क-सौ. स्वाती वसंत पवार

मु. पो. भादस , शिळेश्वर.

ता. मुळशी, जि. पुणे.

**"ईको व्हिलेज" जंगल स्टे -**संपर्क-श्री.परिमल & श्री.रामराव

मु. पो. पाथरशेत , ता. मुळशी, जि. पुणे

मार्ग - पुणे ते लव्हासा

चांदणीचौक ते ईको व्हिलेज साधारण ५७ कि. मी.

लवासा मेन गेट ते आडमाळ मेन गेट - तेथून पुढे.

आडमाळ नंतर पाथरशेत बोर्ड- राजबाग,

ईको व्हिलेज, मंगल स्टेशन.



<u>मावळ तालुका</u>




मावळ तालुक्यातील भूमी तशी सह्याद्रीच्या अजस्त्र रांगांनी सजलेली तशीच कलासौंदर्यानेसुद्धा नटलेली. त्यामुळेच येथे लोहगड, विसापूर, तुंग तिकोणा, राजमाची यासारखे बळकट किल्ले आहेत. तशीच भाजे, कार्ला, बेडसे, यासारखी अद्वितीय कलाकुसरीनी सजलेली लेणीदेखील आहेत. त्यामुळे सह्याद्रीच्या किल्ल्याच राकट रूपडं अनुभवताना अशा लेण्यापाशी आपली पावले नकळत थबकतात. याचं सौदर्य

न्याहाळण्यासाठी घालविलेल्या काही तासांचा अवधीसुद्धा आपल्याला वेगळाच आनंद देऊन जातो.

बेडसेची बौद्ध लेणी हे असंच एक अनवट ठिकाण हजारो वर्षापूर्वीची निर्मिती असलेल्या लेणीत सौंदर्य अगदी ठासून भरलेलं त्याहीपेक्षा अजूनही अबाधित असलेलं.  बौद्ध धर्माने जसे अहिंसेचे तत्वज्ञान जगाला सांगितले तसेच जगाला अशा लेण्याच्या रूपाने अजरामर कलाकृती देऊन सर्वांनाच उपकृत केले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. बेडसे लेणीबाबत एक दुदैवाची गोष्ट मात्र येथे खटकते.



जशी कार्ला, भाजे येथील लेण्यांना प्रसिद्धी मिळाली तशी येथील लेणी मात्र पर्यटकांच्या नजरेसाठी उपेक्षितच राहिली. त्यामुळे अनेक पर्यटक इतर लेण्यांना आवर्जुन भेट देतात. पण जवळच असलेल्या बेडसे लेणीचा मात्र विसर पडतो. इतका सुंदर ऐवज आपल्या आसपास असून देखील आपलं हे दुर्लक्षिलं जाण हे केवळ अक्षम्य असते. त्यामुळेच वेळ काढूनच या लेण्याकडे आपली पावले वळवावी.

बेडसे लेणीला भेट देण्यासाठी मावळ तालुक्यातील कामशेत येथे रेल्वेने अथवा रस्त्याने उतरून पवनानगरच्या दिशेने करूंज गाव गाठायचे या गावातूनच लेणीसाठी एक रस्ता गेलेला आहे. हा तुम्हाला पायथ्याशी असणाऱ्या बेडसे गावात आणून सोडतो.  येथूनच वरपर्यंत अगदी सुस्थितीत असलेल्या पाय-यांनी आपण या कलेच्या  भांडारासमोर उभे राहिलेलो असतो. अन् येथूनच पुढे सुरू होतो आपल्या नजरांचा खेळ......

दक्षिण - उत्तर अशी मांडणी असणारे हे लेणं एका दगडात कोरलेलं. सुरूवातीला काहीसा अर्धवट असलेला स्तुप, चैत्यगृह, विहार, पाण्याची टाकी अशा सा-यांचा मिळून हा लेण्यांचा समुह, पुर्वाभिमुख असलेला यातील चैत्यगृह मधोमध विराजमान,याच्याच डाव्या बाजुला एक अर्धवट स्तुप व त्याच्या शेजारीच एका बौद्ध भिक्षूच स्मारक चैत्यगृहाचा व्हरांडा - हे सर्व पाहतच विशाल चैत्यगृहाच्या पुढील भागात म्हणजेच व्हरांड्यात प्रवेश करायचा. या व्हरांड्याचा डोलारा सांभाळला आहे असे वाटणारे चार नक्षीदार खांब म्हणजे 'अहो आश्चर्यम'!अष्टकोनी आकाराचे हे खांब एक वेगळाच विषय होऊ शकतात. इतकं यात ठासून सौदर्य भरलेलं दिसून येते.

यातील दोन खांब हे भिंतीत असून अर्धे बाहेर आल्यासारखे आणि उरलेले दोन पूर्णाकृती अगदी मधोमध उभारलेले. या खांबांच्या तळाला एक घडविलेला दगडाचा कलश याच कलशावर थोडेसे निमुळते होत गेलेले अष्टकोनी खांब यांच्यावर जमिनीच्या दिशेने उमललेले कमळ त्यावर चौरंग नंतर हंर्मिका व त्याच चौथऱ्यावर बैल,घोडा, हत्ती असे प्राणी बसलेले दाखविण्यात आले आहेत.

या प्राण्यांच्यावर स्त्री-पुरूषांच्या आकृत्या अन् यांचे हात वरती छताला टकलेले. एवढं सारं वैभव अवघ्या एका खांबात सामावलेलं असे ओळीने चार खांब पाहून आपण व्हरांड्यात

म्हणजेच चैत्यगृहाच्या प्रवेशद्वारासमोरील आणि या खांबाच्या मधोमध येतो. या मोकळया जागेच्या दोन्ही बाजूला खोल्या काढलेल्या. या खोल्यांच्या वर विविध आकाराच्या चैत्यकमानी कोरलेल्या. हे सर्व न्याहाळताना डोळे दिपवल्याशिवाय राहत नाही.



## लोणावळा :

पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील दक्षिण-मध्य रेल्वेवरील महत्त्वाचे स्थानक व थंड हवेचे ठिकाण. हे पुणे शहराच्या वायव्येस ६४ किमी., सह्याद्रीतील बोरघाटाच्या माथ्यावर सस.पासून ६००-६१६ मी. उंचीवर वसले आहे. दऱ्याखोऱ्यांनी व वृक्षराजींनी सुशोभित बनलेले हे ठिकाण आल्हाददायक हवामानामुळे पर्यटकांचे मोठेच आकर्षण ठरले आहे.

पर्यटकांचे आकर्षण ‘ड्यूक्स नोज’, लोणावळा-खंडाळायोगविद्येच्या शास्त्रशुद्ध अभ्यासाकरिता स्वामी कुवलयानंद (१८८३-१९६६) हे थोर शारीरिक शिक्षणवेत्ते व योगविद्येचे प्रयोगशील पुरस्कर्ते. ह्यांनी लोणावळा येथे १९२४ मध्ये ‘कैवल्यधाम’ नावाची योगशिक्षणसंस्था उभारली. हिला जोडूनच ‘श्री नटवरसिंह रुग्णविज्ञानशाला’ नामक एक रोगचिकित्सा संस्थाही स्थापण्यात आली. आध्यात्मिक मार्गदर्शन, आध्यात्मिक शिबिरांचे संयोजन,योगमीमांसा त्रैमासिकाचे संपादन व प्रकाशन, नागरिकांसाठी धर्मार्थ औषधालय, कैवल्यधामसंचालित यौगिक प्रशिक्षण देणारे योगमहाविद्यालय-यो गाचे सर्वांगीण प्रशिक्षण देणारे भारतातील एकमेव महाविद्यालय-इत्यादींमुळे कैवल्यधामची कीर्ती देशविदेशांत पसरली आहे. लोणावळ्याच्या ‘आयएनएस् शिवाजी’ या नौकेवर नाविक अभियांत्रिकी प्रशिक्षण दिले जाते. यामुळेही शहराचे महत्त्व वाढत गेले आहे. येथे मुलामुलींचे वसतिगृह-विद्यालय (गुरुकुल-विद्यालय) १९४९ पासून कार्यशील आहे. १९६२ पासून ते स्वतःच्या भव्य वास्तूत ‘गुरुकुल’ शिक्षणकार्य पार पाडत आहे. विद्याप्रसारिणी सभेची इंग्रजी व मराठी माध्यमांतून शिक्षण देणारी तीन विद्यालये तसेच एक महाविद्यालयही आहे. शहरात पारशी, खोजा, बोहरा आदींची अनेक आरोग्यभुवने आहेत.

लोणावळा येथे रंग-निर्मितीचा एक कारखाना असून टाट विद्युत् योजनेचे कार्यालयही येथेच आहे. नगरपालिकेचे विश्रामगृह, बगीचे,मोफत वाचनालय, दवाखाने, अनेक हॉटेले, निवासगृहे, चर्च इ. सुविधा येथे आहेत. लोणावळा येथे बनविण्यात येणारी ‘चिक्की’प्रसिद्ध आहे. येथे एक औद्योगिक वसाहत स्थापण्यात आली आहे.

लोणावळयाच्या नैर्ऋत्येस ४.८ किमी.वर टायगर्स लीप (व्याघ्रउडी), तर पश्चिमेस चार किमी.वरील ‘नागफणी’ (ड्यूक्स नोज) ही प्रेक्षणीय पर्यटन-स्थाने आहेत..

**कामशेत**

पुणे जिल्हयातलं कामशेत हे ठिकाण निसर्गसौंदर्याने नटलेलं आहे. पॅराग्लायडिंगसाठी प्रसिद्ध असलेलं हे ठिकाण. कोंडेश्वर मंदिर, वाडीवली लेक यासारखी काही ठिकाणंही प्रसिद्ध आहे. खंडाळा आणि लोणावळा या दोन पर्यटन स्थळावरून अवघ्या १७ किमीवर हे ठिकाण असल्याने कार्ला-भाजा केव्हज, बेडसा केव्हज आणि कोंडेश्वर मंदिर ही ठिकाण कामशेतच्या आसपास पाहायला मिळतील.

**पानशेत**

महाराष्टरातील लोकांना काही वर्षापुर्वी धरण फुटल्यामुळे पुण्यात झालेल्या हाहाकारामुळे पानशेत धरण  ऐकुन माहित असेलपण आता पानशेत आणी वरसगाव ही धरणे आता पर्यटकांमुळे प्रसिद्ध होऊ लागली आहेत.तिथे असणारे वाटर स्पोर्ट .स्पीड बोट, वाटर स्कुटर वगैरे वाटर स्पोर्ट उपलब्ध आहेत. आंबी या नदीवर बांधलेले पानशेत आणि आणि मोसे या नदीवर बांधलेले वरसगाव.सिंहगडला जाणार्या रस्त्यावरच सिंहगडाच्या पुढे २० कि.मी.वर पानशेत आहे. या दोन्ही धरणांच्या मध्ये एम. टी. डी. सी. ने उत्तम रेस्ट हाऊस बांधले आहे.येथे जेवणाची सोय देखिल उत्तम होते.

**मावळ**

पश्चिम घाटातल्या सहयाद्री डोंगररांगांच्या कुशीत वसलेलं हे गाव. त्याच्या आसपास काही लहान लहान गावं पाहायला मिळतात. या ठिकाणी कित्येक नद्यांचे उघम बघायला मिळतात, ज्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत जातात. म्हणूनच या पावसाळ्याच्या दिवसात या ठिकाणी कित्येक जण सहलीसाठी येतात. अंदर मावळ, पवन मावळ, गुंजन मावळ, नाने मावळ यासारखी बारा लहान लहान गावं या परिसरात आहे.

**ढाक**




तसं म्हटलं तर हा वाटेवरचाच नाहीतर अगदीच आडवळणाचा किल्ला आहे. पुणे-मुंबई मार्गावरील कामशेत गावातुन साधरणता २० किलोमीटर उत्तरेला जांभिवली गावात रस्ता जातो तिथुन ढाकला जाता येते.हा मार्ग सगळयात सोयीस्कर आणी पुण्यापासून जवळ असल्याने सहज एका दिवसातही किल्ला गाठता येतो.मुंबईवरून येणा-यांसाठी  कर्जत पासून 'सांडशी' किंवा 'वाढप' गावातून ढाकला पोहोचता येते. अजून एक मार्ग लोणावळा ते राजमाची रस्त्यावर सुमारे ७ ते ८ किलोमीटर गेल्यानंतर उजवीकडे एक फाटा ढाकच्या  दिशेला वळतो इथून साधारणता दोन ते अडीच तासात पोहोचता येते.

## खांडी

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील कान्हे फाट्यापासून  उजवीकडे वळले की 25 ते 30 किमी आत खांडी हे छोटं खेडे गाव आहे. येथे प्रामुख्याने भात शेती केली जाते. मात्र त्यापूर्वीच तुम्हाला कांब्रे, डाहुली, वडेश्वर ही छोटी-छोटी गावे लागतात. रस्ता तसा थोडा कच्चाच आहे. येथे जाण्यासाठी तुम्ही स्वत:च्या दुचाकी किंवा चारचाकी गाडीने (दुचाकी असली तर उत्तम) जाऊ शकता अन्यथा तळेगाव दाभाडे येथून खांडीसाठी बसही जाते. पिंपरी-चिंचवड शहरापासून अगदी दीड ते दोन तासावर हे ठिकाण आहे.

खांडीचा टेबल लॅन्ड पॉईंट तर डोळयाचे अक्षरश: पारणेच फेडतो. या पठारी प्रदेशावरून सहज जरी नजर फिरवलीत तरी खांडी परिसरातील हिरव्या वनराईचे, झ-यांचे, रंग बदलणाऱ्या नभाचे दर्शन होते. त्यामुळे खास सुट्टी काढून आपण इथे आलो व आपला पैसा आणि वेळ वसूल झाला ही भावना मनात आल्याशिवाय रहात नाही. तशातच एखाद्या धबधब्याखाली मनसोक्त भिजण्याचा आनंद घेणे व श्रावणात तर ऊन पावसाच्या खेळात भिजत गाडीवरून खांडी फिरण्याची तर मजाच काही औरच आहे. या ठिकाणचं सौंदर्य पाहायला केवळ पुणे,पिंपरी-चिंचवडच नव्हे तर मुंबई वरूनही काही पर्यटक आवर्जून येतात.

आत्ताशी कुठे पर्यटकांची पाऊले खांडीकडे वळायला लागली आहेत. त्यामुळे येथे खाण्याची विशेष सोय होऊ शकत नाही. एक तर तेथील घरांमध्ये जाऊन भाजी -भाकरीची

ऑर्डर द्यावी लागते अन्यथा काही छोटी हॉटेल्सही आहेत जेथे गरमा-गरम चहा, मिसळ किंवा वडापाव मिळू शकतो. ज्यांना तेथे जमणार नाही त्यांनी मग सरळ कान्हे फाट्यावरच पेटपूजा करावी.





**'कांब्रे लेण्या'ची.** कांब्रे गावातून वडेश्वर डोंगररांगेचा जबरदस्त कातळकडा आणि बोरवलीचा अजस्र धबधबा थक्क होऊन बघत होतो. पल्याड कातळात कोरलेल्या 'कांब्रे लेण्यां'नी लक्ष वेधलं. गावकरी म्हणाले, 'आरं पोरांन्नू, कुठं तरास घ्येता जीवाला. वाटेत आहे ो थोरला खडक. नाही रं जमायचा तुम्हास्नी.' म्हणलं बघूयात जमतंय का. आमची वाट अडवली ४० फुटी गुळगुळीत रॉकपॅचनं. आधार मिळवण्यासाठी 'अंगविक्षेप' करत पिंच होल्ड्स पकडत कसंबसं माथ्यावर पोहोचलो. आता आमच्यामध्ये आणि मुख्य लेणी यांच्यादरम्यान होता सरळसोट कातळकडा आणि एक अनपेक्षित आश्चर्य – लेण्यात प्रवेश करण्यासाठी कडय़ाच्या पोटातून कोरलेला १५ फूट लांबीचा बोगदा! लेणी खोदवणाऱ्या

अभियंत्याच्या कौशल्यानं आम्ही  खुळावलोच. मुख्य लेण्यांत निवासी गुहा, मोठ्ठाली खोलवर कोरत नेलेलीटाकी, सारीपाट खेळाचा आराखडा आणि धान्य दळण्याचं उखळ दिसलं. पण, एखादा शिलालेख, शिल्पं अथवा स्तूप असं काहीच आढळलं नाही. अपरिचित ‘कांब्रे लेणी’ पाहून आम्ही खूश, पण या ‘पाऊलखुणा’ कोणाच्या, हे गूढ काही उलगडेना.

## चाकण

तळेगाव - चाकण रस्त्यावर, तळेगाव पासून ३ किमी अंतरावर इंदुरी गाव आहे. या गावात इंद्रायणी नदीच्या काठी एक छोटी गढी आहे. या गढीला इंदुरीचा किल्ला म्हणून ओळखले जाते. छ.शाहू महाराजांचे सेनापती खडेराव दाभाडे यांना वतन म्हणून मिळालेल्या तळेगावाला नंतर तळेगाव दाभाडे या नावाने ओळखले जाऊ लागले.

मुंबई-पुणे रेल्वेमार्ग व महामार्गावरील तळेगाव हे मोठे शहर आहे. तळेगाव - चाकण रस्त्यावर तळेगाव पासून ३ किमीवर इंद्रायणी नदीवरील २ पूल आहेत. यातील डाव्या बाजूच्या पुलावरुन जाणारा रस्ता इंदुरी गावात जातो, तर उजवीकडील रस्ता इंदुरी गावाच्या बाहेरून जातो. इंद्रायणी नदीवरील पुलावरूनच आपल्याला इंदुरीचा किल्ला दिसायला लागतो. किल्ल्यात जाण्यासाठी तटबंदीच्या कडेकडेने जाणार्‍या रस्त्याने तटबंदी संपे पर्यंत चालत जावे . पुढे डाव्या बाजूस एक गल्ली आहे. त्या गल्लीत वळल्यावर समोरच किल्ल्याचा भव्य दरवाजा दिसतो. किल्ल्या समोर उभे राहील्यावर डावीकडे एक रस्ता खाली उतरतो, त्या रस्त्यावर किल्ल्यापासून २ मिनिटाच्या चालीवर ब्रम्हेश्वर मंदिर आहे. इंद्रेश्वर मंदिर इंदुरी गावात आहे.

## आजूबाजूची पाहाण्याची ठिकाणे :-

## इंदुरीचा किल्ला

इंदुरी गावत परतलो. तिथे किल्ल्याचा बाहेर एका माणसाला विचारले तर त्याने आत जाउन देवी चे दर्शन घेण्यास सांगीतले. गाडी किल्ल्याच्या आतमधे थेट मंदिरापर्यंत जाते. आतमध्ये कडजाई देवीचे मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम चालु आहे. किल्ल्याच्या आतला

परिसर एकदम दुर्लक्षीत आहे. झाडा झुडपांचे रान माजले आहे. तटबंदी पर्यंत जाणेही अवघड आहे. गडाचे प्रवेशद्वार मात्र बघण्यासारखे आहे.







## ब्रम्हेश्वर मंदिर

इंदुरी किल्ल्याच्या बाजूला इंद्रायणी नदीच्या काठी पुरातन ब्रम्हेश्वर मंदिर आहे. मंदिराचा जिर्णोध्दार झाल्यामुळे त्याचे बाह्यरूप बदलले आहे. परंतू मंदिराचा गाभारा अजूनही जूनाच आहे. गाभाऱ्याचे व कळसाचे काम काळया दगडात केलेले आहे. गाभाऱ्या बाहेर गणपतीची मुर्ती आहे. गाभाऱ्याच्या चौकटीवर वरच्या बाजूला गणपतीची मुर्ती आहे, तर खालच्या बाजूला कोरलेले आहे. मंदिरा बाहेर जूना दगडात कोरलेला नंदी व दोन पिंडी आहेत.

## इंद्रेश्वर मंदिर





इंदुरी गावात तळेगाव चाकण रस्त्याला लागून तलावाकाठी पुरातन इंद्रेश्वर मंदिर आहे. मंदिराचा जिर्णोध्दार झाल्यामुळे त्याचे बाह्यरूप बदलले आहे. परंतू मंदिराचा गाभारा अजूनही जूनाच आहे. गाभाऱ्याचे व कळसाचे काम काळया दगडात केलेले आहे. गाभाऱ्या बाहेर गणपतीची मुर्ती आहे. गाभाऱ्याच्या चौकटीवर वरच्या बाजूला गणपतीची मुर्ती आहे.
मंदिरा बाहेर दगडात कोरलेला जूना नंदी व गणपती आहेत.

ऋषींच्या शापाने अंगावर आलेले कोड घालवण्यासाठी इंद्राने येथे तपश्चर्या करून येथील तलावात आंघोळ केल्यावर त्याच्या अंगावरचे कोड निघून गेले अशी या मंदिरा बद्दल दंतकथा आहे. या मंदिरासमोरील तलाव आता पाण वनस्पतींनी भरल्यामुळे दिसेनासा झालाय. जर हा तलाव साफ करून सुशोभित केला, तर या परीसराची शोभा वाढू शकते.

इंदुरी गावापासून भंडारा डोंगर ३ किमी अंतरावर आहे. भंडारा डोंगरावर तुकाराम महाराजांचे मंदिर व बौध्द कालिन गुहा आहेत. भंडारा डोंगर, शिवाजी महाराज आणी तुकाराम महाराजांची भेट झाली ते ऐतिहासीक ठिकाण. तुकाराम महाराजांचे एक मंदीर असुन, काही वारकरी मंडळी त्याचे देखभाल करतात. मंदिरात संत तुकाराम महाराज, विठोबा रखुमाई, गणपती , शिवलिंग अशा देवतांच्या मुर्ती आहेत. दर्शन घेउन डोंगर परिसर पहायला निघालो. मंदिरा शेजारी एक मोठा डेरेदार वटवृक्ष आपले लक्ष वेधुन घेतो. तेथुन सभोवताली दिसणरे दृश्य तर खासच आहे.

३) राजवाडा व बनेश्वर मंदिर , तळेगाव

४) चाकणचा किल्ला

<u>सरदार खंडेराव दाभाडे समाधी स्थळ</u>











## पांडव मंदिर

गावात सहसा बघायला न मिळणारे पांडव मंदिर आहे, एका ठिकाणी दौप्रदी  झोपली आहे अशी मुर्ती आहे. मंदिर छोटेच आहे. पण वेगळे आहे.









## पेठजवळची  दुर्गरचना

पेठ (कोथळीगड) किल्ल्याच्या कोकण पायथ्याला  बौद्धधर्मीय ‘आंबिवली लेणी’, आहे.खुद्द किल्ल्याच्या पोटातली विशाल गुहा म्हणजे कातळकोरीव लेणंच म्हणायचं, माथ्यावर जाण्यासाठी पोटातून कोरून काढलेला कातळमार्ग अगदी विस्मयकारक आहे. या सगळयांसोबत आणखी एक ठिकाण म्हणजे ज्या जुन्या घाटवाटेचं रक्षण हा दुर्ग करीत असे, त्या ‘कौल्याच्या धारे’च्या वाटेवर आहेत पाण्याची कातळकोरीव टाकी.

## कुसूर घाट

घाटमाथा आणि कोकण यांना जोडणारा ‘कुसूर घाट’ ही बघायला हवा. काही ठिकाणी वाट दगड बसवून पक्की केलेली, तर काही ठिकाणी वाट रुंद केल्याच्या खुणा. आणि, मग दिसतात कातळात खोदलेली पाण्याची जुनी पाच टाकी. जमिनीच्या पातळीत चौकोनी मुख असलेली आणि आत खोलवर नेलेली टाकी इथे असणं, ही कुसूर घाट नि:संशय पुरातन आणि महत्त्वाचा असल्याची ही खूण आहे. पण या ‘पाऊलखुणा’ कोणाच्या हे मात्र उलगडत नाही..

## ढाक दुर्ग परिसर

मावळात ‘गाळदेवी घाटा’नं चढ्ले की कोकणातला भिवगड, बलदंड ‘ढाक दुर्ग’ आणि ‘ढाक बहिरी’च्या गडद गुहेतल्या बहिरीदेवाच्या दर्शनाचा थरार अनुभवता येतो. बहिरीची गडद (गुहा) म्हणजे प्राचीन लेणंच. कोरीव लेणी, पायऱ्या, पाण्याची टाकी, घाटवाट आणि दुर्ग सारे काही आहे.

## भिरीभिरी भ्रमंती





मावळात काही थोडय़ाशा पाऊलखुणा आहेत असे मी  साईप्रकाश बेलसरे ह्यांचा लेख वाचला आहे. जसे की अन्सुटेजवळ गडद गुहेत लेणी खोदाई सुरू केल्याच्या खुणा, परिठेवाडीतून डोंगरापल्याड 'गडदच्या लेण्यां'कडे जाणाऱ्या पायऱ्या, कळमजाई राऊळ – दीपमाळा – वाघोबा शिल्प आणि परिठेवाडीच्या कातळकडय़ाच्या पोटातलं महादेवी राऊळ असे बरेच काही. निगडे गावाजवळ लेणी आहेत वळणावरच्या कातळावर लोखंडी शिडी असल्याने पटकन खोदीव पायऱ्या गाठता येतात आणि 'निगडे लेणी' पाशी पोहचतो. पाण्याची टाकी आणि मुख्य दालन पाहून पद्मवती ऊर्फ पदूबाईच्या घुमटी आहे.तिथे आहे शेंदूरचर्चित तांदळा आणि वाघोबा शिल्प.

मावळाच्या फक्त २०-२५ किमी परिसरात हे सर्व आहे. म्हणजे एखादा शनिवार, रविवार भटकंती करायला हवी.

दुर्गसोबती ढाक आणि पेठचा किल्ला आणि त्यांच्या पोटातली लेणी.गाळदेवी- कुसुर- फेण्यादेवी- कौल्याची धार अशा ठळक घाटवाटा;कांब्रे- अन्सुटे- गडद- कल्हाट- निगडे पद्मवती- पीराचा डोंगर- फिरंगाई अशी कातळकोरीव लेणी या परिसरात आहे. ही भ्रमंती

जेव्हा मी स्वता करेल तेव्हा नक्कीच विस्तृत बोलुया. हा पण तोपर्यन्त तुम्ही फिरुन आल्यास मला नक्की कळवा. म्हणजे माझीही भटकंती सोपी होईल.

## गडद लेणी

गडद गावात ग्रामदैवत भैरवनाथाचं मंदिरामागे देवराईत खुप जुने वृक्ष आहे. पल्याड दुर्गेश्वर ठाण्यापाशी कडय़ाच्या खळग्यात स्थापिलेल्या शिवलिंगावर अव्याहत जलाभिषेक होत असतो. आणि पाठीमागे दुर्गेश्वर लेणी आहेत. वरती जायला बर्याच अरुंद आणि शेवाळलेल्या पायर्या आहेत. वरती साध्या खोदाईची कोरडी टाकी, ५० फूट रुंद – ४० फूट खोल आकाराचं मुख्य दालन, धान्याचे उखळ, आतील भागातील छोटी खोली, लगतचं दुर्गेश्वराचं देऊळ आणि वाघोबा – दीपमाळ – नागप्रतिमा – शिवलिंग असं साधं आहे. बाकी शिलालेख, स्तूप असं काही नाही.

## 'फेण्यादेवी' घाट

कोकणातून आंदर मावळाचा घाटमाथा गाठण्यासाठी 'फेण्यादेवी' नावाची घाटवाट आहे. घाटमाथ्याजवळ घाटाची देवता आहे 'फेण्यादेवी'.

## तासूबाई डोंगर

मावळात नजर गरगरेल अशा खोल घळईसमोर तासूबाईचं राऊळ स्थापलेलं आहे. आसपास कोरलेल्या लढाऊ वीर आणि वाघोबाची भग्न शिल्पं आहेत.

## वरसूबाई राऊळ

लोणावळे – भीमाशंकर ट्रेकरूटवरच्या जादुई 'वांद्रे खिंडी'ला बिलगलेला'वरसूबाई'च्या डोंगर. तासाभराच्या चढाईनंतर माथ्यावरच्या सडय़ावर वरसूबाई राऊळापाशी पोहोचतो. शेंदूर माखलेला देवीचा तांदळा, वाघराशी लढणारा वीर – दीपमाळ – मारुती असं थोडके अवशेष. कोणी – कधी स्थापिलं असेल हे. कोणाच्या या पाऊलखुणा?

## फिरंगाई लेणी, पिराचा डोंगर

तळेगाव एमआयडीसीपासून प्रवास करताना जेसीबी कंपनीमागे डोंगरात कातळाच्या पोटात एक दिवा खुणावायचा. देवस्थान झाल्याने आता चांगली मोठ्ठी वाट आहे. खोदीव

पायऱ्या, पाण्याची टाकी, विहार पाहून मुख्य दालनापाशी आलो. दुर्गम उंचावरच्या विहारात फिरंगाई देवीचं राऊळ स्थापन केलंय. निसरडय़ा कातळात कोरलेल्या जुन्या खोबणी चढणं पूर्वी अवघड असणार. आता मात्र लोखंडी शिडीवरून देवीचं दर्शन घेणं सोप्पं झालंय. प्रशस्त विहारात देवीचा शेंदूरचर्चित तांदळा आणि काळ्या पाषाणातली मूर्ती चांदीच्या मखरीत शोभते. आत अजून एक छोटी खोली आणि महिषासूरमर्दिनीची साधी मूर्ती आहे. मंदिराबाहेर इंद्रायणी खोरं खुणावत होतं. नवलाख उंबरे या जुन्या गावाजवळची ही लेणी कोणी, कधी आणि का खोदवली, कुणास ठावूक.. पल्याड मंगरूळच्या 'पिराच्या डोंगरा'वर भटकायला गेलो, तेव्हा खांब सोडून खोदवलेली पाण्याची विशाल टाकी, अर्धवट सोडलेला विहार आणि पायऱ्या गवसल्या.

**कल्हाट लेणी**

तर पाठीमागच्या डोंगराच्या करकरीत कातळकडय़ाच्या पोटात गडद गुहा खुणावत होत्या. थेट गुहांपाशी पोहोचणं अवघड असल्याने, मोठ्ठय़ा वळशाच्या वाटेचा 'द्राविडीप्राणायाम' करणं भाग होतं. पायथ्यापासून गडद न्याहाळत पश्चिमेच्या उभ्या दांडावरून डोंगरमाथ्यावर गेलो. परत अलीकडे येत घळीतून उतरत गडदजवळ आलो. इतकं लांब आल्यावर इथे खरंच 'लेणी' सापडावीत, अशी आस लागली. निसटत्या ट्रॅव्हर्सवर नजर अक्षरश: ग-र-ग-र-ली. आणि, आमच्यासमोर उलगडू लागली जगाला अल्पपरिचित अशी कल्हाटची लेणी. विविध विहार, बेसॉल्टमधील रोपी लाव्हाच्या खुणा, पाण्याची खोल खोदत नेलेली विशाल टाकी आणि तीन छोटय़ा खोल्या असलेला विहार समूह बघितला. शिलालेख किंवा दागोबा अशी चिन्हं नव्हती. अखेरीस गवसलं सर्वात अचंबित करणारं एक फूटभर व्यास असलेले एक मुख-शिल्प. कानात मोठ्ठय़ा िरगसारखी कर्णफुले, तर माथ्याजवळ गोल महिरप, मोठ्ठे बंद डोळे-नाक-जाड ओठ. खरंच, एक अमूल्य ठेवा!!! कुठले हे शिल्प, कधीची ही लेणी.. या पाऊलखुणा कोणाच्या, हे कोडंच!

http://www.discoversahyadri.in/2015/03/AndhraBasinUnknownKalhatCaves.html

<u>प्रतीशिर्डी श्री साईबाबा मंदिर, शिरगाव</u>



हे मंदिर दोन ट्रस्ट मधे चालते. एक अन्नछत्र राजवाडा, आणि दुसरे साईबाबा संस्थान. संपुर्ण मंदिराला चमक असलेला तपकिरी रंग दिलेला आहे. त्यामुळे एक वेगळेपण जाणवते.मंदिरचा परिसर मोठा आहे. बाबांची चावडी देखिल जाताना समोरच दिसते. येथे ३० रुपये कुपन घेउन महाप्रसादाची, तसेच अल्पोहाराची सोय देखिल केली आहे. जातानाच रस्त्याला एक मोठा गणपती आपल्याला दिसतो.

प्रतीशिर्डी श्री साईबाबा मंदिर

शिरगाव, सोमाटणे फाटा, मावळ तालुका

टेली फोन नंबर -०२११४२-२८१४६८, ०२११४२-२३१२१३




## कुंडमळा

बेगडेवाडी रेल्वे स्टेशनच्या शेलारवाडी गावापासून १५ ते २० मिनिटांच्या अंतरावर असलेला हा 'कुंडमळा' निसर्गाचा एक चमत्कारच म्हणावा लागेल. पुणे-मुंबई महामार्गावरून गाडीने आला, तर घोरावडेश्वर डोंगराच्या समोरील रेल्वेस्टशनकडे जाणाऱ्या रस्त्याने आत वळावे. आणि जर लोणावळा लोकलने आलात तर बेगडेवाडी रेल्वेस्टेशनला उतरले, की गाववस्तीच्या दिशेने वाटचाल केल्यास अगदी जवळच हा निसर्गाचा चमत्कार पाहायला मिळातो. येथील परिसर खूपच निसर्गरम्य आहे. सभोवताली डोंगर, हिरवाई, जवळून वाहणारी इंद्रायणी नदी आणि या नदीवर एक सिंगल पुल आहे. एक दुचाकी जेमतेम जाईल, असाच मजेशीर हा पूल आहे. या पुलावरून देखील येथील दगडांवर वेगाने आदळणाऱ्या पाण्याचा प्रवाह, त्याचा खळखळाट, खाली असलेल्या खडकांवर पाणी कोसळून तयार झालेल्या खोल दऱ्या व रांजणखळगे हे मन मोहून टाकतात.

तळेगाव - बेगडेवाडी रेल्वे स्टेशनच्या मध्ये भारत शासनाने १९४२ साली ऑर्डनेन्स डेपो सुरू केला आहे. हा संपूर्ण परिसर देहूरोड लष्करी तळाच्या हद्दीतून जातो. त्यामुळे येथे फिरायला जाणा-यांना किंवा अन्य कोणालाही फोटो काढण्यास मनाई आहे. पर्यटकांनी फक्त कुंडमळ्याचे फोटो काढावेत. इतर गोष्टींचे फोटो काढल्यास लष्करी कारवाई करण्यात येऊ शकते. येथील पाण्यात जाताना जरा जपून जावे कारण पावसाळ्याच्या दिवसात येथील पाण्याला बराच वेग असतो. काही जण निसर्गाचा आस्वाद घेण्याऐवजी पाण्यात भिजवण्यासाठी व हुल्लडबाजी करण्यासाठीच फिरण्याचे बेत आखत असतात. अशा लोकांनी शक्यतो या ठिकाणी जाऊन अपघाताला निमंत्रण देऊ नये. स्वत: चे आणि पर्यावरणाचे देखील रक्षण करावे.तेथे खाण्या-पिण्याची सोय नाही.




PUNE
Tourist Map
N
Nigdi
To Mumbai
To Mumbai
Chakan
Proposed Airport
Danori
Chinchwad
Wakad
Pimpale Nilakh
PCMC, Akurdi
Sangavi
NH-4
Kalas
C.M.E
Lohagaon
Mula River
Balewadi
Dapodi
Chest Hospital
Lohagaon Aerodrome
Khadki RS
Mumbai Pune Rd.
Yerawada Jail
Baner
Mumbai Bangalore Bypass
Aundh
Botanical Garden
Khadki West
Viman Nagar
University Rd.
Mental Hospital
Pune University
Shalimar
Deccan College
Yerwada
Kharadi
Pashan
Raj Bhavan
Khadki East
Gunjan
Kalyani Nagar
Sutarvadi
N.C.L
Tanajivadi
Mula-Mutha River
Govt. Polytechnic
Gordon House
Holiday Inn
Osho International
Engg. College
Taj
Koregaon Park
Pashan Lake
Shivajinagar RS
Regency
Mundhava
Palaleshwar Temple
Le Meridien
Pune RS
Ghorpad RS
To Solapur
Erandvane
Symbiosis
Shaniwar Wada
Central Park
Bavdhan kh.
Law College
Raviraj
Race Course
Kinara
Alka
Grand
Gaothan
Manjari Bk.
Kothrud
Film & T.V Institute
Cantt. Hospital
Swargate
Solapur Rd.
Hadapsar
Amar
Laxmi Narayan
NH-9
Military Hospital
Neelayam
Tilak Vidyapeeth
To Mirag
Hingne
Warje
Parvati
Wanavadi
Mutha River
Muktangan
Mahadji Shinde Chhatri
Shivne
Hingane Kh.
Mohamadwadi
Wadagaon Bk.
Kondhave Kh.
Dhanakvadi
Shivaji Rd.
Katraj Zoo
Map not to Scale
Wadagaon Kh.
NH-4
Kondhave Bk.
Copyright © 2010 www.mapsofindia.com
(Updated on 15th Feb. 2010)
Ambegaon Bk.
Katraj
Legend
Highway
Other Road
Rail Line
Hotel
Hospital
Religious Place
Education
Imp. Landmark
Cinema
Vegetation
Water Body

## मिलिंद बाग कृषी पर्यटन

हे कृषी पर्यटन पार्क पुण्यापासुन काही किलोमीटर अंतरावर आहे. हे निसर्ग प्रेमी व नवीन ठिकाणे शोधणार्यांना उत्तम स्थान आहे.  येथील सिंचन पद्धती आणि नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत प्रात्यक्षिक बघणे हा एक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दौरा ही होऊ शकतो. येथे स्विमिंग पूल, सूर्य माध्यमातून कार्यरत सौर पंप प्रात्यक्षिक, बायोमास गॅसिफायर वीज निर्माण करण्यासाठी,ग्रीन हाउस, झाडावरील घर, काही प्राचीन वस्तु संग्रहालय,पोषक जेवण आहे आणि असे बरेच काही आहे.

कुसगाव पोस्ट चांदखेड, तालुका मावळ  पुणे- ४१०५०६ फोन नं – ९८२०५२२८३८
http://www.milindbaug.com/






## खाद्य संस्कृती

पेशवेकालीन पुण्याने पारंपारिक स्वयंपाकाची पध्दत अजूनही कायम राखली आहे. पुण्याच्या खास जेवणामध्ये पुरणपोळी, आमटी, पिठलं-भाकरी, वरण-भात, मटकीची ऊसळ, थालीपीठ, आणि अळूचीवडी यांचा समावेश होतो. बाकर वडी आणि मिसळ पाव, वडा पाव हे प्रसिद्ध पुणेरी पदार्थ आहेत. तसेच गोड खाणा-यांसाठी श्रीखंड व ऋतुमानाप्रमाणे मिळणारी आमरस-पुरी या पदार्थांनी महाराष्ट्राची पारंपारिक मेजवानीची पुर्ण होते.आधुनिक काळात पुण्याने इतर आंतरराष्ट्रिय पदार्थांशी ही जसे पास्ता , पिझ्झा , चायनिज पदार्थ व अनेक कॉंटिनेंटल पदार्थ यांच्याशी मैत्री केली आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान